रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक २८४
www.ramprahar.com
शुक्रवार, २ मे २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

उरणच्या सागरी किनाऱ्यावर पोलिसांनी वाढवली गस्त/२
अनियंत्रित बांधकामांना लगाम हवा/४
कामगार स्मृती चषक आदिवासी कबड्डी स्पर्धा/८

## पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्यासाठी नवी डेडलाइन



**नवी दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताने पाकिस्तानी नागरिकांना मायदेशात परतण्याचा आदेश दिला. यासाठी ३० एप्रिल ही डेडलाइन निश्चित करण्यात आली होती, परंतु वाघा-अटारी सीमेवर अडकलेल्या पाकिस्तानी नागरिकांच्या विनंतीनंतर डेडलाइनमध्ये बदल करण्यात आला. पुढील आदेश येईपर्यंत पाकिस्तानी नागरिक त्यांच्या देशात परतू शकतात, असे केंद्रीय गृह मंत्रालयाकडून स्पष्ट करण्यात आले. गृह मंत्रालयाने आपल्या आदेशात म्हटले आहे की, पाकिस्तानी नागरिकांना देश सोडण्यासाठी ३० एप्रिल अंतिम तारीख निश्चित करण्यात आली होती, जी आता वाढवण्यात आली. पुढील आदेश येईपर्यंत पाकिस्तानी नागरिक अटारी सीमेवरून त्यांच्या देशात परतू शकतात.

# कलाकारांसाठी 'वेव्हज' जागतिक व्यासपीठ

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचे प्रतिपादन; परिषदेचे उद्घाटन



**मुंबई : प्रतिनिधी**

'वेव्हज' अर्थात वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अ‍ॅण्ड एन्टरटेन्मेंट समिट-२०२५चे शानदार उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गुरुवारी (दि. १) झाले. या वेळी बोलताना त्यांनी वेव्हज हे प्रत्येक कलाकार आणि निर्मात्यासाठी जागतिक व्यासपीठ आहे, असे प्रतिपादन केले.

मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेंशन सेंटरमध्ये झालेल्या या कार्यक्रमात राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रेल्वे, माहिती व प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव, परराष्ट्र व्यवहारमंत्री एस.जयशंकर, माहिती प्रसारण राज्यमंत्री डॉ.एल.मुरुगन, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्यासह देश-विदेशातील मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्र दिनाच्या मराठीत शुभेच्छा देत पंतप्रधान मोदी यांनी उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर गुजरातच्या स्थापना दिनानिमित्तही त्यांनी गुजरातीत शुभेच्छा दिल्या. भारतीय अन्न जगाचे आवडते बनत आहे. येत्या काळात भारताचे गाणेदेखील जगाची ओळख बनेल, असे ते म्हणाले.

भारत आता सर्जनशील महासत्ता म्हणून जगाचे नेतृत्व करण्यास सज्ज आहे. वेव्हज परिषद हा केवळ एक कार्यक्रम नाही, तर ही एक चळवळ असून पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या प्रेरणेतून ती महाराष्ट्रात साकारत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले, तर भारतात पहिल्यांदाच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी (आयआयसीटी) मुंबईत स्थापन होणार असून त्यासाठी केंद्र सरकारने ४०० कोटी रुपये मंजूर केले आहेत, अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.

अभिनेते अनुपम खेर यांनी प्रस्तावनेद्वार वेव्हज् आयोजनाचा उद्देश सांगितला. वेव्हज सल्लागार मंडळाच्या सदस्यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी गुरुदत्त, पी.भानुमती, राज खोसला, ऋत्विक घटक, सलील चौधरी यांच्या भारतीय सिनेमातील योगदानाच्या स्मरणार्थ टपाल तिकिटाचे अनावरण पंतप्रधान मोदींच्या हस्ते करण्यात आले.



**पनवेल : महाराष्ट्र राज्य स्थापनेचा वर्धापन दिन गुरुवारी मोठ्या उत्साहात साजरा झाला. यानिमित्त तहसील कार्यालयाच्या प्रांगणात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर त्यांनी उपस्थितांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या आणि विकासासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी पवन चांडक, तहसीलदार विजय पाटील, नायब तहसीलदार तसेच विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

## १०० दिवसांच्या धोरणात्मक कार्यक्रमात कोकणाचा डंका

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शासनाच्या सर्व ४८ विभागांना १०० दिवसांचा धोरणात्मक कार्यक्रम आखून दिला होता. यामध्ये कोकण विभागाचा डंका वाजला आहे, तर महिला व बालविकास विभाग सर्वोत्तम मंत्रालयीन विभाग ठरला.

सर्वोत्तम जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी प्रथम क्रमांक ठाणे (९२%), द्वितीय नागपूर (७९.४३), तृतीय नाशिक व पुणे (७५.४३); सर्वोत्तम महापालिकांमध्ये उल्हासनगर प्रथम (८६.२९), पिंपरी-चिंचवड द्वितीय (८५.७१), पनवेल व नवी मुंबई (७९.४३) तृतीय; सर्वोत्तम पोलीस आयुक्त मीरा भाईंदर (८४.५७) प्रथम, ठाणे (७६.५७) द्वितीय, मुंबई रेल्वे (७३.१४) तृतीय; सर्वोत्तम विभागीय आयुक्त कोकण (७५.४३) प्रथम, नाशिक व नागपूर (६२.२९); सर्वोत्तम पोलीस परिक्षेत्र महानिरीक्षक/उपमहानिरीक्षक कोकण (७८.८६) प्रथम, नांदेड (६१.१४) द्वितीय; सर्वोत्तम पोलीस अधीक्षक पालघर (९०.२९) प्रथम, गडचिरोली व नागपूर ग्रामीण (८०) द्वितीय, जळगाव (६५.७१) तृतीय यांनी क्रमांक पटकावले.

एकूण ४८ विभागांपैकी १२ विभागांनी आपली १००% उद्दिष्ट पूर्तता केली आहे, तर आणखी १८ विभागांनी ८०%पेक्षा जास्त उद्दिष्टे साध्य केली आहेत. मुख्यमंत्र्यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले.

## गव्हाण येथे ध्वजारोहण समारंभासह ग्रामसभा

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून एकूण ३० लाखांची मदत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गव्हाण ग्रामपंचायतीमध्ये महाराष्ट्र दिन गुरुवारी (दि.१) उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या वेळी प्रशासक महेश घबाडी यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले, तर यानंतर माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभा घेण्यात आली.



या ग्रामसभेत गव्हाण गावाच्या विकासाला चालना देण्यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी तब्बल २५ लाख आणि प्राथमिक आरोग्य केंद्राला पाच लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचे जाहीर केले.

ग्रामसभेमध्ये ग्रामपंचायत हद्दीतील विविध विकासकामांवर चर्चा झाली. यात उलवे नोड प्लॉट क्रमांक ६, सेक्टर १२ येथील लोकनेते रामशेठ ठाकूर क्रीडांगणाचे सुशोभीकरण आणि विकासकामांचा सखोल आढावा घेण्यात आला. **(पान २ वर..)**

## मंत्री डॉ. अशोक उईके आज घेणार आदिवासींची भेट



**पनवेल :** राज्याचे आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके शुक्रवारी (दि.२) उरण विधानसभेतील विविध आदिवासीवाड्यांना भेट देणार आहेत. यामध्ये रानसई, सारसईमी इर्शाळवाडी, बोरगाव आदी वाड्यांची ते पाहणी करणार आहेत. बागेचीवाडी येथील कार्यक्रमात आदिवासी बांधवांना लोककला साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे तसेच इर्शाळवाडी येथील पुनर्वसित आदिवासी बांधवांशी मंत्रीमहोदय संवाद साधणार आहेत. त्यांच्यासमवेत आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांच्यासह विभागातील पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

## प्रत्येक दहशतवाद्याला शोधून ठार करणार -ना. अमित शाह



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्यात सहभागी आणि कट आखणाऱ्या प्रत्येकाचा शोध घेऊन त्याला ठार केले जाईल, असा जाहीर इशारा दिला आहे. दिल्लीमधील एका कार्यक्रमात ते बोलत होते.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पहिल्यांदाच ना. अमित शाह यांनी गुरुवारी (दि. १) सार्वजनिक कार्यक्रमात हजेरी लावली. दहशतवाद्यांसाठी वाईट वेळ येणे अजून बाकी आहे, असे त्यांनी आसामच्या बोडो समुदायाचे नेते उपेंद्र नाथ ब्रह्मा यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्याच्या आणि त्यांच्या नावावर एका रस्त्याला नाव देण्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित कार्यक्रमात म्हटले.

ज्यांनी कोणी पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला केला आहे, त्यांना सोडणार नाही. हल्ल्यासाठी जबाबदार प्रत्येकाला शोधून काढू आणि ठार करू. २६ लोकांना मारून आपण जिंकलो असे समजू नका. हे पंतप्रधान नरेंद्र मोदींचे सरकार आहे. कोणालाही सोडले जाणार नाही. देशाच्या प्रत्येक इंचावरून दहशतवादाचे उच्चाटन करण्याचा आमचा निर्धार असून तो पूर्ण होईल, असेही ना. शाह यांनी म्हटले.

## निवडक

### पंजाबमध्ये दहशतवादी कट उधळला; शस्त्रास्त्रे, दारूगोळा जप्त

**अमृतसर :** सीमा सुरक्षा दलाने (बीएसएफ) पंजाब पोलिसांच्या समन्वयाने अमृतसर जिल्ह्यातील भरोपाल गावाजवळ दहशतवादी कट उधळून लावला असून शस्त्रास्त्रे आणि दारूगोळ्याचा साठा जप्त केला आहे. संयुक्त शोधमोहिमेत सुरक्षा दलांना दोन हातबॉम्ब, तीन पिस्तूल, सहा मॅगझिन आणि ५० जिवंत काडतुसे आढळली. जप्त केलेली शस्त्रे व स्फोटके पुढील तपासासाठी स्थानिक पोलिसांकडे सोपवण्यात आली आहेत.

### आलोक जोशी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळाच्या प्रमुखपदी

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळाचे प्रमुख म्हणून भारतीय गुप्तचर यंत्रणा रॉचे माजी प्रमुख आलोक जोशी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. केंद्राने या बोर्डाची पुनर्रचना केली असून पंतप्रधानांना राष्ट्रीय सुरक्षा आणि परराष्ट्र धोरणाच्या बाबींवर बोर्ड सल्ला देईल. जोशी यांच्याव्यतिरिक्त संरक्षण प्रमुख, अतिरिक्त राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार, उपराष्ट्रीय सुरक्षा सल्लागार, सरकारचे संरक्षण, परराष्ट्र व्यवहार, गृह, वित्तमंत्री आणि नीती आयोगाचे उपाध्यक्ष सुरक्षा परिषदेचे सदस्य आहेत.





# उरणच्या सागरी किनाऱ्यावर पोलिसांनी वाढवली गस्त

## पहलगाम हल्ल्यानंतर सतर्कता; कसून तपासणी

**उरण : प्रतिनिधी**

जम्मू-काश्मीर राज्यातील पहलगाम येथील दहशत वादी हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तान या दोन देशात निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर कोकणच्या सागरी किनारपट्टीवर अधिक सतर्कता बाळगली जात आहे.त्यामुळे उरण येथील संवेदनशील सागरी किनाऱ्यावर सुरक्षेच्या दृष्टीने उरण पोलिसांनी गस्त वाढविली आहे. याशिवाय काही कालावधीसाठी पर्यटकांना पिरवाडी किनारा बंद ठेवण्यात आला होता.



नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात सागरी सुरक्षा सुरक्षित राखण्याच्या दृष्टीकोनातून पोलीस आयुक्त नवी मुंबई यांच्या आदेशानुसार उरण पोलीस ठाणे व मोरा सागरी पोलीस ठाणे हद्दीतील सागरी किनाऱ्याच्या ठिकाणी मागील दोन दिवस सागरी सुरक्षा कवच अभियान राबविण्यात आले.हे सागरी सुरक्षा कवच अभियान दोन दिवसांचे असून उरण तालुक्यातील चार किनारपट्टीवर सुरक्षा म्हणून ही मोहीम राबविण्यात आल्याची माहिती उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक जितेंद्र मिसाळ यांनी दिली आहे.

उरण तालुक्याला सागरी किनाऱ्यांनी वेढले आहे.त्यामुळे उरण तालुक्याला सागरी किनाऱ्यावरच अतिरेक्यांचा धोका उद्भवू शकतो. सागरी सुरक्षा किती बळकट आहे, हे पाहण्यासाठी दोन दिवस हे सागरी सुरक्षा कवच राबविण्यात आले आहे.

मुंबई भाऊचा धक्का येथून उरणकडे येणाऱ्या प्रवासी व संशयित व्यक्ती यांची कसून तपासणी व चौकशी करून त्यांच्या जवळ असलेल्या सामानाची याचीही तपासणी मोरा बंदरात करण्यात येत आहे.

याचप्रमाणे पिरवाडी समुद्रकिनारा, खोपटे, वशेणी,पाणजे,मोरा बंदर, घारापुरी येथील राजबंदर, शेटबंदर, केगाव येथील लँडिंग पॉईंट, मरीन सोल्युशन, हनुमान कोळीवाडा, मोरा ऑपरेशन चौकी व घारापुरी ऑपरेशन चौकी येथे चोख पोलीस ताफा ठेवण्यात आला होता. या वेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षकांसह पोलीस हवालदार, महिला पोलीस कर्मचारी यांचा पोलीस ताफा सज्ज ठेवण्यात आला होता.

### सागरी किनारपट्टी अतिशय महत्त्वाची

***दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर मुंबईजवळ असलेली उरणची सागरी किनारपट्टी अतिशय महत्त्वाची आहे.१९९३ सालचा बॉम्ब हल्ला आणि २६/११चा दहशतवादी हल्ला या दोन्ही वेळी उरणच्या सागरी किनाऱ्यावरील हालचालींवर तपास करण्यात आला होता. त्यामुळे ही सर्तकता पाळली जात आहे.***

# पनवेल परिसरात तीन वेगवेगळ्या अपघातात तिघांचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात तीन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या अपघातात तीघा जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

पनवेल जवळील चिंचवण गावाच्या हद्दीत अंग्रेजी ढाब्यासमोर पादचारी सद्दाम हुसेन हुल्लौर (३५) याला कोणत्यातरी अज्ञात वाहनाची धडक बसल्याने त्यात तो गंभीररित्या जखमी होवून मयत झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

तर मुंब्रा-तळोजा मार्गावर नावडेगाव येथे अज्ञात कारने दुचाकीला धडक दिल्याने दुचाकीस्वार सुलतान अब्दुल रऊस हसवारे (२१) या तरुणाचा मृत्यू झाला. पनवेल येथे राहणारा सुलतान हा मध्यरात्री सव्वा बारा वाजण्याच्या सुमारास तळोजा येथून दुचाकीवरून पनवेल येथे जात असताना, अज्ञात कारने त्याच्या दुचाकीला धडक दिल्याने त्याचा मृत्यू झाला.

तळोजा एमआयडीसीत डोंबिवलीतील पलावा सिटीत राहणारे शशी नायर त्यांच्या दुचाकीने तळोजा एमआयडीसीत आले होते. ते आयजीपीएल कंपनीकडून बेल नाक्याच्या दिशेने जात असताना अज्ञात डंपरने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या आपघातात नायर गंभीर जखमी झाले. उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. तळोजा पोलिसांनी फरार कारचालक व डंपरचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# माणगावमधील साठवलेल्या कचऱ्याच्या विल्हेवाटीचा शुभारंभ

**माणगाव : बातमीदार**

माणगाव शहरातील कचऱ्याच्या ढिगाऱ्याचा निपटारा करण्यासाठी बायो मायनिंग तंत्रज्ञानाचा वापर करुन शास्त्रोक्त पद्धतीने या डंपिंग कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात येणार आहे. यासाठी नगरपंचायतीचे सर्व नगरसेवक व येथील मुख्याधिकारी यांच्या पुढाकारातून शिवसेना नेते ॲड.राजीव साबळे यांनी स्वतः शासन दरबारी सतत पाठपूरावा करुन, अखेर १ मे २०२५ महाराष्ट्र दिनी कचरा डंपिंगची समस्या मार्गी लागली आहे.

शहरात ज्या प्रमाणात कचऱ्याचे संकलन होते, त्या तुलनेत अतिशय कमी प्रमाणात कचऱ्यावर प्रक्रिया होते. त्यामुळे माणगांव उतेखोल येथील आश्रमशाळे लगत असलेल्या डम्पिंग यार्डमध्ये लाखो मेट्रिक टन कचरा संकलित होऊन कचऱ्याचे ढिगारे साचलेले दिसतात व वारंवार येथील कचरा डंपिंगला लागलेल्या आगीमुळे माणगांव शहरात प्रचंड प्रमाणात वायुप्रदूषणाची समस्या दिवसेंदिवस अतिशय गंभीर होत नागरिकांचे सार्वजनिक आरोग्य धोक्यात आले होते.

डंपिंग लगत वनवासी आश्रम शाळेच्या वसतिगृहातील साडेचारशे शालेय विद्यार्थ्यांना त्रास होत असल्याने अनेक वर्षांपासून आश्रमशाळेकडून तक्रार करण्यात येत आहे. तसेच येथील पत्रकार, सामाजिक जाणकार युवा वर्गाने पत्रकारितेतून सतत आवाज उठविला होता, अखेर ही गंभीर समस्या सोडविण्यास यश आले आहे.

पुणे येथील संबंधित कामाचे अनुभवी असलेले भाग्यदिपस् वेस्ट मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे ठेकेदार तानाजी पवार



यांना हे कंत्राट दिले असून साधारण महिनाभरात येथील कचऱ्यावर प्रक्रियाकरुन हा डंपिंग यार्ड मोकळा करुन समस्या सोडविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. अत्यंत आवश्यक महत्त्वपूर्ण कामाची सुरुवात १ मे महाराष्ट्र दिनाचे औचित्याने माणगांव नगरीच्या नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आली आहे.

यावेळी उपनगराध्यक्षा हर्षदा सोंडकर, आरोग्य व स्वच्छता सभापती सुशिला वाढवळ, नगरसेविका सुविधा खैरे, नगरसेवक राजेश मेहता, अजित तार्लेकर, दिनेश रातवडकर, सचिन बोंबले, नगर पंचायतीचे मुख्याधिकारी संतोष माळी व अधिकारी विशाल कदम, शहर समन्वयक अतुल जाधव, रवींद्र कुवेसकर यांचे हस्ते श्रीफळ वाढवून येथील करण्यात आला.

# महिला व बालविकास खाते राज्यात पहिले; नागोठण्यात जल्लोष

**नागोठणे : प्रतिनिधी**

आजचा दिवस हा महाराष्ट्रासाठी आणि विशेष महिला व बालविकास विभागासाठी अत्यंत गौरवाचा आहे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या १००दिवस कृती आराखडा उपक्रमात महिला व बालविकास विभागाने कल्याणकारी योजणांची यशस्वी अंमलबजावणी, विभागाचे आधुनिकिरण व लोकांभिमुख प्रशासन हे ध्येय साध्य करत ८०%गुणांसह राज्यात प्रथम क्रमांक पटकावले त्याबद्दल बद्दल रायगडच्या सुपुत्री खासदार सुनील तटकरे यांची कन्या राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदितीताई तटकरे यांचे नागोठणे राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे दुपारी ४ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात फटाक्यांच्या अतिषबाजीत जल्लोष साजरा करून आनंद व्यक्त केला व उपस्थित सर्व कार्यकर्त्यांकडून अदितीताई तटकरे यांचे अभिनंदन करण्यात आले.

नागोठणे येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जल्लोष साजरा करताना राष्ट्रवादीचे नेते भाईसाहेब टके, हरीशशेठ काळे, नागोठणे शहर अध्यक्ष बाळासाहेब टके, महिला आघाडी जिल्हा सरचिटणीस आशा शिर्के, महिला आघाडी शहर अध्यक्षा सुजाता जवके,शहर उपाध्यक्षा प्रतिभा तेरडे, जुगनशेठ जैन, अनिलशेठ काळे, दिलीपशेठ शहासने, बिपीन सोष्टे, उल्हास शिंदे, उमाजी चव्हाण, गणेश नागोठकर, मनोज टके, चेतन टके, ॲड. श्रीकांत रावकर, ॲड. रमेश जाधव, सिद्देश काळे, ज्ञानेश्वर दळवी, गुड्डू मोदी, आदी प्रमुख कार्यकर्त्य उपस्थित होते.




# महाराष्ट्र राज्य स्थापनेचा वर्धापन दिन कर्जतमध्ये उत्साहात साजरा

**कर्जत : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६५वा वर्धापन दिन कर्जत मध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. काही शाळांमध्ये परीक्षांचे निकाल असल्याने तत्पूर्वी त्या शाळांमध्ये ध्वजारोहण करण्यात आले आणि त्यानंतर विदयार्थ्यांना निकालपत्र देण्यात आले.

गुरुवार दि. १ मे महाराष्ट्र दिना निमित तहसील कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित केलेल्या प्रशासकीय कार्यालयातील समारंभात उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ यांच्या हस्ते धवजरोहण करण्यात आले. याप्रसंगी तहसीलदार डॉ. धनंजय जाधव, गट विकास अधिकारी सुशांत पाटील, नायब तहसीलदार सचिन राऊत, पुरवठा अधिकारी रवींद्र दळवी, कृषी अधिकारी राजाराम शिंदे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता संजीव वानखेडे, शाखा अभियंता अक्षय चौधरी, मंडल अधिकारी संतोष जांभळे,



माजी उपनगराध्यक्ष रामकृष्ण मोकल, असिफ मिर्झा आदी मान्यवर उपस्थित होते.

नगरपरिषद कार्यालयात मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष राजेश लाड, रजनी गायकवाड, माजी नगरसेवक बळवंत घुमरे, सोमनाथ ठोंबरे, नगरसेविका पुष्पा दगडे, मधुरा चंदन, नितीन परमार, कार्यालयीन अधीक्षक रवींद्र लाड, नवनाथ दाभाडे, मनाली वैशंपायन, सोनाली चव्हाण, सुप्रिया बगडे आदींसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयात उपविभाग पोलिस अधिकारी डी. डी. टेळे, कर्जत पोलिस ठाण्यात पोलिस निरीक्षक सुरेंद्र गरड, पंचायत समिती कार्यालयात गट विकास अधिकारी सुशांत पाटील, अभिनव ज्ञान मंदिर प्रशाले मध्ये संस्थेचे सचिव नंदकुमार मणेर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

# महिलेला अश्लील शिवीगाळ करून मारण्याची धमकी; गुन्हा दाखल

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील मौजे काळीज बौध्दवाडी या ठिकाणी एका महिलेला अश्लिल भाषा वापरून शिवीगाळी करत मारण्याची धमकी देणाऱ्या तिच्या शेजारी राहणाऱ्या ९ जणांन विरोधात महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात खबर देणार व आरोपी हे एकमेकांचे शेजारी राहणारे असुन त्यांचे जमिनीवरुन वाद सुरु आहे. ४ मार्च रोजी खबर देणार यांचे जागेवर काही आरोपी हे टपरीचे बांधकाम करीत होते. खबर देणार यांनी याबाबत विचारणा केली असता आरोपी यांनी शिवीगाळी करत तु कोण आम्हाला विचारणारी आणि मनात लज्जा उत्पन्न होईल अशी भाषा वापरली




त्यानंतर काही आरोपींनी २७ एप्रिल २०२५ रोजी दुपारी १२ वा चे सुमारास खबर देणार यास त्याच ठिकाणी बेकादेशीररित्या एकत्र जमुन शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी महिलेनी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारी नुसार अक्षय प्रमोद मोहिते, प्रशांत प्रमोद मोहिते, प्रज्ञा प्रमोद मोहिते, कुणाल विजय मोहिते,वनिता अनिल मोहिते,राज आनंद मोहिते,दिपेश आनंद मोहिते, कुणाल आनंद मोहिते,वैभव तांबे सर्व रा. काळीज बौध्दवाडी यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास पोहवा गायकवाड करीत आहेत.

# खोपोलीत ज्वेलर्सच्या दुकानात चोरी करणाऱ्या महिलेला अटक

**खोपोली : प्रतिनिधी**

ज्वेलर्सचा मालक दुकानात नसल्याची संधी घेत गल्ल्यामधुन ५हजार ५०० रूपयाची चोरी करणा-या सरस्वती ऊर्फ चंद्रा गोविंद थापा(वय ३८,रा.वावर्ले बाबा डेअरी मागे खालापूर मूळ नेपाळ) हिला अटक करण्यात आली आहे..

खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ३०एप्रिल रोजी दुपारी दिड वाजणेच्या सुमारास जे.पी.जसराज ज्वेलर्स मध्ये थापा हिने संधी साधुन गल्ल्यामधुन चोरी केली.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास महिला पोलीस हवालदार पूजा कांबळे ह्या करीत आहेत.

# जासई हायस्कूलला आयएसओ मानांकन व स्पर्धा परीक्षेत यश

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग,जासई या शैक्षणिक संकुलास आयएसओ मानांकन मिळाले. विद्यालयात सुरू असलेले विविध शैक्षणिक उपक्रम,शाळेची गुणवत्ता,भौतिक सुविधा, स्वच्छता व शैक्षणिक वातावरण इत्यादी गोष्टींचे परीक्षण होऊन हे सन्मानाचं आयएसओ मानांकन मिळाले आहे.



तसेच या विद्यालयातील इयत्ता पाचवी स्कॉलरशिप मध्ये तीन विद्यार्थी आणि इयत्ता आठवी स्कॉलरशिप मध्ये दोन विद्यार्थी तसेच एन एम एम एस स्कॉलरशिप मध्ये दोन विद्यार्थी असे एकूण आठ विद्यार्थी स्कॉलरशिप व एन एम एस साठी पात्र ठरलेले आहेत. या विद्यार्थ्यांचा सत्कार शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष कामगार नेते सुरेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे चेअरमन अरुण जगे होते ,त्यांनी या विद्यार्थ्यांना रोख बक्षिसे दिली,यावेळी रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक .नूरा शेख,व्हाईस चेअरमन डी. आर.ठाकूर,रघुनाथ तात्या, आदित्य घरत,महादेव म्हात्रे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

या यशाबद्दल विद्यालयाच्या प्राचार्या म्हात्रे के.जी,उपमुख्याध्यापक कुटे व्हि.के,पर्यवेक्षिका मुकादम स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख.ठाकूर, पुनम मुंगाजी यांचा सत्कार केला. आयएसओ मानांकन व स्पर्धा परीक्षेतील यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य.रामशेठ ठाकूर साहेब, विभागीय चेअरमन.बाळाराम पाटील ,विभागीय अधिकारी कोंगेरे .सहाय्यक विभागीय अधिकारी जगताप आणि विद्यालयातील सर्व कमिटी सदस्य यांनी विद्यालयाचे कौतुक केले.

पान १ वरुन

## गव्हाण येथे ध्वजारोहण समारंभासह ग्रामसभा

क्रीडांगणाची संरक्षण भिंत सिडकोच्या माध्यमातून बांधून घेण्यासाठी आवश्यक ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. यासोबतच सेक्टर १२, प्लॉट क्रमांक ७मधील बागेच्या कामाच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला आणि उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत चर्चा झाली. गावातील पाणीपुरवठ्याच्या महत्त्वाच्या विषयावरही सविस्तर मंथन झाले. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी सिडको अधिकाऱ्यांसोबत तातडीने बैठक आयोजित करण्याचा निर्णय ग्रामसभेत घेण्यात आला.

या ग्रामसभेला काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष



महेंद्र घरत, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, अरुणशेठ भगत, पंचायत समितीच्या माजी सदस्य रत्नप्रभा घरत, भाऊशेठ पाटील, माजी सरपंच वसंत म्हात्रे, माजी उपसरपंच विजय घरत तसेच विश्वनाथ कोळी, वामन म्हात्रे, योगिता भगत, माई भोईर, जिज्ञासा कोळी, सचिन घरत यांच्यासह ग्रामपंचायतीचे माजी सदस्य, पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# महाराष्ट्र राज्य स्थापना दिनानिमित्त महापारेषणमध्ये ध्वजवंदन

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य ६६ व्या स्थापना दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) महापारेषणचे संचालक (संचलन) सतीश चव्हाण यांनी ध्वजवंदन करून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. यावेळी राष्ट्रगीत व राज्यगीत सादर करण्यात आले. संचालकांनी महाराष्ट्र दिनाच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी संचालक (मानव संसाधन). सुगत गमरे, अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) सुचिता भिकाने, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) मंगेश शिंदे, मुख्य औद्योगिक संबंध



अधिकारी भरत पाटील, अधीक्षक अभियंता. अमित नाईक, सचिन खडगी, विशाल वाघचौरे, उपमुख्य दक्षता अधिकारी प्रशांत गोरडे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) तथा राजशिष्टाचार अधिकारी . सतिश जाधव, व्यवस्थापक (मानव संसाधन) . पारस सवाई, अश्विनी तेरकर यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### दुखवटा

## नामदेव थोरवे

**कर्जत :** दहिवली गावातील ज्येष्ठ सामाजिक व राजकीय कार्यकर्ते नामदेव मारुती थोरवे यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा ३ मुली जावई व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने भोई समाज्यातील एक कार्यकर्ता एक मार्गदर्शक हरपल्याची भावना ग्रामस्थानी बोलून दाखवली.



# धावपळीच्या जीवनात म्युझिक थेरपीसारखे पर्यायी उपचार महत्त्वाचे -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

धावपळीच्या जीवनात मानसिक शांतता आणि लवकर बरे होण्यासाठी म्युझिक थेरपीसारखे पर्यायी उपचार महत्त्वाचे आहेत, असे प्रतिपादन पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी लायन्स सरगम म्युझिक थेरपी सेंटरच्या उद्घाटनावेळी केले. लायन्स सरगम क्लबने आरोग्य आणि शांततेच्या दिशेने उचललेल्या महत्त्वाकांक्षी लायन्स सरगम म्युझिक थेरपी सेंटरचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर झाले.



या वेळी लायन्स क्लबचे प्रांतपाल परमेश्वरन, प्रथम प्रांतपाल संजीव सुर्यवंशी यांच्यासह डिस्ट्रिक्टमधील अनेक मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. सरगम क्लबच्या अध्यक्षा डॉक्टर मानदा पंडित यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमामुळे गरजूंना आता संगीतोपचाराचा लाभ घेता येणार आहे. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, आजच्या धकाधकीच्या जीवनात, औषधोपचार महत्त्वाचे असले तरी, लवकर बरे होण्यासाठी आणि मानसिक शांतता मिळवण्यासाठी म्युझिक थेरपीसारखे पर्यायी उपचार अत्यंत आवश्यक आहेत. सरगम लायन्स क्लबने मोफत म्युझिक थेरपी उपलब्ध करून देऊन एक उदात्त कार्य हाती घेतले आहे, याबद्दल त्यांचे अभिनंदन.

प्रमुख पाहुणे प्रांतपाल एन. आर. परमेश्वरन आणि प्रथम प्रांतपाल संजीव सुर्यवंशी यांनीही केवळ दोन वर्षांच्या कालावधीत सरगम क्लबने केलेल्या विविध सामाजिक कार्यांचे कौतुक केले आणि या नवीन उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमादरम्यान, आदित्य दोशी यांनी संगीतोपचाराचे प्रभावी प्रात्यक्षिक सादर केले, ज्यामुळे उपस्थितांना या उपचार पद्धतीची प्रत्यक्ष अनुभूती मिळाली. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन संजय गोडसे यांनी केले, तर आभार प्रेमेंद्र बहिरा यांनी मानले.

लायन्स सरगम म्युझिक थेरपी सेंटरमध्ये दर गुरुवारी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत दिव्यम ज्योती होलिस्टिक सेंटर, ५०२, श्री गणेश अपार्टमेंट, सुश्रुषा रुग्णालयासमोर, संगीतोपचार सेवा पुरवली जाणार आहे. या सेवेचा लाभ घेण्यासाठी पूर्व नोंदणी करणे आवश्यक आहे. या उद्घाटन सोहळ्याला रिजन चेअरमन सुयोग पेंडसे, झोन चेअरमन अल्केश शहा, सचिव प्रेमेंद्र बहिरा, संजय गोडसे, डॉ. आदित्य दोशी, ओंकार खेडकर, अश्विनी खेडकर, सुषमा पन्हाळे, महेंद्र लोहार, प्रदीप भट्टाचार्य यांच्यासह डिस्ट्रिक्टमधील अनेक पदाधिकारी आणि पनवेल शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कामोठ्यातील आरोग्य केंद्रांना भाजप पदाधिकाऱ्यांची भेट

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्षाच्या वतीने कामोठे विभागातील सेक्टर २२, ८ आणि ३५ येथील तीन आरोग्य केंद्रांना भेट देण्यात आली. या दौऱ्यात केंद्रातील आरोग्य सेवा, उपलब्ध सुविधा आणि कर्मचाऱ्यांच्या व रुग्णांच्या अडचणी यांचा थेट आढावा घेण्यात आला.

सद्यस्थितीत महापालिकेमार्फत या केंद्रांचे काम चांगल्या पद्धतीने सुरू असून काही सुधारणा आवश्यक आहेत, हे या भेटीद्वारे स्पष्ट झाले.



या भेटीत भाजप कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत यांच्यासह नगरसेवक विजय चिपळेकर, रवी गोवारी, भाऊ भगत, रावसाहेब बुधे, तेजस जाधव, मयूर मोहिते, दामोदर चव्हाण, सुशील शर्मा, जय डिगोळे, सुरेंद्र हल्लिकर, अमोल जाधव, रश्मी भारतवाज, स्वप्निल पाटील, प्रवीण कोरडे तसेच अनेक भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

केंद्रातील डॉक्टर्स, कर्मचाऱ्यांची संख्या, औषधसाठा आणि पायाभूत सुविधा यासंदर्भात सविस्तर माहिती घेतली या आरोग्य केंद्रांमध्ये दररोज सुमारे १२० ते १५० नागरिकांची उत्तम सुविधा देत तपासणी होते. त्याहून अधिक तज्ञ डॉक्टरांची टीम आठवड्या मधून एकदा उपलब्ध असते. स्वच्छ परिसर हे या केंद्रांचे वैशिष्ट्य आहे. नागरिकांनी या सेवेचा लाभ निःसंकोच घ्यावा.

# उरणमध्ये महाराष्ट्र दिन उत्साहात



**उरण : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६५ वा वर्धापन दिन समारंभनिमित्त गुरुवारी (दि. १) सकाळी ८ वाजता उरण विधानसभा मतदार संघ आमदार महेश बालदी यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण तहसील कार्यालय, उरण येथील प्रांगणात करण्यात आले.

या वेळी उपजिल्हाधिकारी भूसंपादन मेट्रो सेंटर जनार्दन कासार, उरण तहसीलदार डॉ. उद्धव कदम, उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ, निवासी नायब तहसीलदार महेश पाटील, महसूल नायब तहसीलदार, रवींद्र सानप, निवडणूक नायब तहसिलदार प्रभाकर नवाळे, संजय गांधी नायब तहसीलदार नरेश पेढवी, उरण नगर परिषद माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, उरण नगर परिषद माजी नगरसेवक कौशिक शाह, माजी उपनगराध्यक्ष रमेश ठाकूर, माजी नगरसेवक राजेश ठाकूर, झुंबर माने, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी उरण तालुका अध्यक्ष परीक्षित ठाकूर, तलाठी बलभीम लाटे, तलाठी प्रशांत शेगोकर चिंतामण गायकवाड, वृषाली पाटील, वैशाली भोईर, ज्योत्सना कांबळे, ललिता घरत, सामाजिक कार्यकर्ते शिवाजी ठाकूर, पालु भिंडे, एम.के.म्हात्रे व तलाठी वर्ग, तहसील कार्यालय कर्मचारी उपस्थित होते.

# कामोठे येथे आरोग्य शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र दिन आणि निर्भय सामाजिक संस्थेच्या चतुर्थ वर्धापन दिनानिमित्त सेक्टर २१, प्लॉट नंबर २०२येथे भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून अनेक नागरिकांनी आरोग्य तपासणी आणि मार्गदर्शनाचा लाभ घेतला. या आरोग्य शिबिराला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन निर्भय सामाजिक संस्थेच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले आणि संस्थेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाला भारतीय जनता पक्षाचे कामोठे मंडळ अध्यक्ष नगरसेवक विकास घरत, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विजय चिपळेकर, दामोदर चव्हाण, सुशील शर्मा, युवा मोर्चा अध्यक्ष तेजस जाधव, हर्षवर्धन पाटील, डॉ. सखाराम गारले, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत यांच्यासह संस्थेचे अध्यक्ष उत्तम जरग, सचिव मनोहर बुराडे, खजिनदार भगवान दबडे, उदय दैत, अतिष खंदारे, दशरथ पाटील, सत्तापा पाटील आणि अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.





**उलवे नोड : सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल येथे महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिन उत्साहात साजरा झाला. स्कूलचे चेअरमन परेश ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी शाळेच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, मराठी माध्यम मुख्याध्यापक दीपक भर्णूके, 'रयत'च्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ज्योत्स्ना ठाकूर, नवनिर्वाचित पालक सभा सदस्य, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.**

# गव्हाण विद्यालयात महाराष्ट्र दिन साजरा




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्याचा स्थापना दिवस अर्थात महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिनानिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज तसेच जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व टी. एन.घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स यांचे संयुक्त विद्यमाने ध्वजारोहण झाले.

विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांच्या शुभहस्ते संपन्न झालेल्या या ध्वजारोहण सोहळ्यास विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, उपसरपंच विजय घरत, एम.एन.एम.विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन भार्गवशेठ ठाकूर तसेच ज्येष्ठ नेते जयवंतराव देशमुख, वसंतशेठ पाटील, रघुनाथ देशमुख, कमलाकर देशमुख, कांती घरत, काशिनाथ पाटील, जिज्ञासा कोळी, इंदुताई घरत, मिनाक्षी पाटील, गव्हाण विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, एम.एन.एम.विद्यालयाच्या नूतन प्राचार्या सायली वाडवळकर, माजी प्राचार्या प्रणिता गोळे,गव्हाण विद्यालयाचे उपमुख्यध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे, एम.एन.एम.विद्यालयाचे पर्यवेक्षक अरुण जोशी आदी उपस्थित होते.

या वेळी गव्हाण विद्यालयाच्या इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये पात्र विद्यार्थ्यांचे अरुणशेठ भगत व मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ, लेखणी व गुलाबपुष्प प्रदान करून अभिनंदन करण्यात आले.

# उलवे येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये महाराष्ट्र दिन



**उलवे : रामप्रहर वृत्त**

उलवे येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये १ मे २०२५ रोजी महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात स्कूलचे अध्यक्ष भार्गव ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाली.

हा कार्यक्रम जे.बी.एस.पी. संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शन आणि आशीर्वादाने झाला. या वेळी संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी सदस्य वसंत पाटील, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, जयवंत देशमुख, शाळा समिती सदस्य विश्वनाथ कोळी, शाळा समिती सदस्य मीनाक्षी पाटील, रघुनाथ देशमुख, कमलाकर देशमुख, अनंता ठाकूर, श्रीकांत घरत, सुधीर ठाकूर, पंढरीनाथ घरत, एम. एन. एम. व्ही. आणि टी. एन. जी. ज्युनिअर कॉलेजच्या मुख्याध्यापिका सायली वाडवलकर आदी उपस्थित होते.

# पनवेल महापालिका मुख्यालयात ध्वजवंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्याच्या ६६व्या स्थापना दिनानिमित्त पनवेल महापालिकेच्या वतीने छत्रपती संभाजीराजे मैदानावर आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आशासेविका व महिला अग्निशामक कर्मचाऱ्यांना आयुक्तांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.



या कार्यक्रमाला अतिरिक्त आयुक्त सर्वश्री भारत राठोड व गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त सर्वश्री डॉ. वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, रविकिरण घोडके, मंगला माळवे, स्वरूप खारगे, सहायक आयुक्त श्रीराम पवार, डॉ. रूपाली माने, सुबोध ठाणेकर, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, शहर अभियंता संजय कटेकर, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.भगवान गीते, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर तसेच महापालिकेचे अधिकारी आणि सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या वेळी रायगड सुरक्षा रक्षक मंडळ, महाराष्ट्र राज्य सुरक्षा बल आणि महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी संचलन करत ध्वजाला मानवंदना दिली.

पनवेल महानगरपालिकेच्या १० शाळांमध्येही ध्वजारोहण करण्यात आले. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आशासेविकांचा सन्मान वर्ष २०२४-२५ मध्ये राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आशा स्वयंसेविकांना रोख रक्कम व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आला. यात प्रथम पुरस्कार : सुनीता पांडुरंग साबळे, द्वितीय पुरस्कार : मेनका कृष्णात सावंत, तृतीय पुरस्कार : सुनंदा बाबू पेठकर यांना देण्यात आला.

यूएसएमधील अलाबामा येथे होणाऱ्या वर्ल्ड पोलीस अॅण्ड फायर गेम्स २०२५ स्पर्धेसाठी पनवेल महानगरपालिकेच्या महिला अग्निशामक शुभांगी घुले (गोळाफेक) व तेजश्री साळुंखे (टेनिस) यांची निवड झाली आहे. या वेळी या दोघींना आयुक्त चितळे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.



## संपादकीय

# भारताकडे कथांचा खजाना!

मुंबईत आयोजित 'वेव्हज समिट'मध्ये बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्याकडे हजारो वर्षांच्या कालातीत कथांचा खजाना आहे असे म्हटले आहे. ते खरेच आहे. जगभरातील लोकांपर्यंत भारतातील या कहाण्या पोहोचल्या तर खरोखरीच त्यांना खूप काही मिळेल. आज जग कथाकथनाच्या नव्या पद्धतींच्या शोधात आहे. अशावेळी हा खजाना जगाच्या कानाकोपऱ्यात घेऊन जाणे ही आजच्या भारतातील सृजनशील तरुणाईची जबाबदारी आहे.

**मुंबईत आयोजित पहिल्या जागतिक ऑडिओ व्हिज्युअल आणि मनोरंजन शिखर परिषदेचे अर्थात 'वेव्हज समिट'चे उद्घाटन गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पार पडले. हा चार दिवसांचा कार्यक्रम मुंबईतील जिओ वर्ल्ड सेंटर येथे होत आहे. 'कनेक्टिंग क्रिएटर्स, कनेक्टिंग कंट्रीज' असे घोषवाक्य असणाऱ्या या शिखर परिषदेतून भारताला मीडिया, मनोरंजन आणि डिजिटल नवप्रवर्तनाचे जागतिक केंद्र म्हणून प्रदर्शित करण्यात येते आहे. भारतातील या पहिल्या वेव्हज समिटचे यजमानपद महाराष्ट्र शासनाने भूषवले आहे. जगभरातील ९० हून अधिक देश या परिषदेत सहभागी झाले असून जगभरातील निर्माते, स्टार्टअप उद्योजक आणि धोरणकर्ते तसेच कलाकार या परिषदेत एकत्र आले आहेत. ही परिषद भारताच्या जागतिक मीडिया क्षेत्रातील सहभागात एक ऐतिहासिक टप्पा ठरेल असे मानले जाते आहे. भारत आज एक 'क्रिएटर नेशन' म्हणून समोर येतो आहे असे प्रतिपादन युट्यूबचे सीईओ नील मोहन यांनी देखील या परिषदेत केले. भारतीय सिनेमा आज जगभरात पोहोचतो आहे. आजच्या घडीला शंभरहून अधिक देशांमध्ये भारतीय चित्रपट प्रदर्शित होतात. परदेशातील लोक भारतीय सिनेमा निव्वळ पाहात नाहीत तर ते त्याच्या प्रेमात पडत चालले आहेत हे तर आज सर्वज्ञात आहे. भारतीय संगीतही जगभरात आपली ओळख निर्माण करीत आहे. एकंदरच भारतातील ही क्रिएटिव्ह इकॉनॉमी देशाच्या जीडीपीमध्ये आपले योगदान वाढवण्याच्या टप्प्यावर आहे. भारत आता चित्रपट निर्मिती, संगीत, फॅशन या हरतऱ्हेच्या निर्मितीचा जागतिक अड्डा बनू पाहतो आहे. यातून देशाच्या अर्थव्यवस्थेत एक नवीनच लाट निर्माण होते आहे. भारताकडे आजच्या घडीला सर्वाधिक मोठ्या संख्येने तरुण आहेत. देशातील ही तरुणाई क्रिएटिव्हीटीमध्ये अग्रेसर असून मेहनतीने ते जागतिक स्तरावर आपली ओळख निर्माण करीत आहेत. अशावेळी केंद्रसरकार या तरुणाईच्या सोबत आहे. त्यांच्या स्वप्नांना सामर्थ्य देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे असे सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, तरुणांनी मोठी स्वप्ने पाहावीत असे आवाहन वेव्हज समिटमध्ये केले. युट्यूबसारख्या मंचावर देखील आज भारताने आपले भरभक्कम स्थान निर्माण केले आहे. गेल्या वर्षभरात देशातून सुमारे दहा कोटी चॅनल्सनी आपला कंटेंट अपलोड केला असून यापैकी १५ हजार चॅनलनी दहा लाख सबस्क्राइबर्सचा महत्त्वाचा टप्पा ओलांडला आहे. गेल्या तीन वर्षांत भारतातील क्रिएटर्स, कलाकार आणि माध्यम कंपन्यांना तब्बल २१ हजार कोटी रूपये युट्यूबकडून अदा करण्यात आले आहेत असेही युट्यूबचे नील मोहन यांनी या परिषदेत सांगितले. आपल्या छंदांना यशस्वी व्यवसायाच्या रूपात प्रस्थापित करण्यात युट्यूबने भारतीयांना बळ दिले आहे. भारतातील या क्रिएटर इकॉनॉमीला आणखी बळ देण्यासाठी युट्यूब येत्या दोन वर्षांत ८५० कोटी रूपयांची गुंतवणूक करणार आहे असेही यावेळी सांगण्यात आले. वेव्हज परिषदेसारख्या मंचामुळे आपल्याकडचे निर्मितीक्षम तरुण जगभरातील दूरदृष्टीच्या लोकांची जोडले जातील अशी अपेक्षा आहे.**

# अनियंत्रित बांधकामांना लगाम हवा

**खबरबात**
प्रकाश सोनवडेकर

अलिबाग व आसपासच्या परिसारात होत असलेल्या विकासाचा वेग पहाता आणि भविष्यात होणार्या प्रकल्पांचा विचार करता भविष्यात आलिबाग तालुका हा मुबईचे उपनगर बनणार आहे. या विकासाबरोबच काही समस्या देखील येणार आहेत. त्याती अनियंत्रित बांधकामे ही सार्वात मोठी समस्या असले याचा विचार केला पाहिजे. अलिबागची ओळख कायम ठेवायची असेल तर अनियंत्रीत बांधकामांना लगाम घातला पाहिजे.अलिबागच्या एकत्रित विकासाचा विचार केला पाहिजे. जर अनियंत्रित बांधकाम वाढली तर अलिबाग बकाल होईल.

विद्यासन एज्यूकेशन फाऊंडेशन आणि जेष्ठ वास्तुविशारद पिनाकीन पटेल याच्या पुढाकाराने नुकतेच सातीर्जे येथे अलिबाग परिसरात होणार्या अनिनियंत्रित बांधकाम प्रकल्पांविरोधात अलिबाग मधील रहिवाशी, सामाजिक संस्था एकत्र आल्या होत्या. त्यांची एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यात मांडव्यापासून ते नागाव पर्यंतच्या ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, स्थानिक रहिवाशी सहभागी झाले होते. या बैठकीत अलिबाग अनियंत्रित बांधकाम प्रकल्प आणि त्यामुळे पायाभूत सुविधांवर वाढलेला ताण यावर चिंता व्यक्त करण्यात आली. त्यामुळे अलिबाग ऑप्टीमिस्ट या नावाखाली शासनस्तरावर पाठपुरावा करण्यासाठी एक दबावगट स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. निसर्गरम्य अलिबागचे मुंबई प्रमाणे काँक्रीटचे जंगल करू नका, येथील निसर्ग आणि पर्यावरणाचे संवर्धन करत या परिसराचा विकास करा अशी मागणी या निमित्ताने करण्यात आली . या कडे एक बैठक म्हणून दर्लक्ष करून चालणार नाही. त्यात भविष्यातील धोके सांगण्यात आले आहेत. त्याकडे लक्ष द्यायला हवे.

अटल सेतू आणि रो रो सेवेमुळे अलिबाग दक्षिणमुंबईच्या जवळ आले आहे. त्यामुळे देशभरातील नामांकीत बांधकाम समुहांनी मोठ मोठे गृहनिर्माण प्रकल्प आणि आलिशान बंगल्याच्या प्रकल्पांची घोषणा केली आहे. मात्र प्रत्येक जण आपल्या प्रकल्पापुरता विचार करत आहेत. अलिबागच्या एकत्रित विकासाचा दृष्टीकोन त्यांच्यात दिसून येत नाही. त्याचे दुरगामी परिणाम येत्या काळात येथील परिसंस्थेवर तसेच जिवनमानावर दिसून येणार आहेत. व्यापारी नफ्यासाठी येथील जिवनमान धोक्यात आणणे योग्य नसल्याचे मत यावेळी या बैठकित वास्तुविशारद पिनाकीन पटेल यांनी व्यक्त केले त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

उंच इमारती आणि टाऊनशीप प्रकल्पांची संख्या बेसुमार वाढली तर पर्यटनावर आधारित अलिबागच्या अर्थव्यवस्थेचे अस्तित्व धोक्यात येण्याची भिती व्यक्त केली गेली. पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होणार आहे. कचर्याचे व्यवस्थापन, सांडपाण्याचा निचारा या समस्या आहेतच. त्यामुळ आरोग्याचे प्रश्न निर्माण होतील. याचा विचार केला पाहिजे. बांधकामांना परवानगी देत असताना या समस्यांचा विचार केला जात नाही.

महामुंबईला पर्याय म्हणून शेजारच्या ठाणे जिल्ह्यात शहर वसबवण्यात आली. वसई , विरार, डोबिवली, कल्याण, अंबरनाथ, बदलापूर येथे शहरीकरण झाले. नविमुबई हे शहर बसविण्यात आले. रायगड जिल्ह्यातील पनवेल महानगरपालिका झाली. अलिबाग व आसपासच्या परिसारात नगारीकरण होत आहे. भविष्यात रेवस व नागाव परिसरात माठ गृहप्रकल्प उभारले जाणार आहेत. बांधकामाना परवानगीदिली जाईल परतु त्यांना पाणी कुठून देणार. याचा विचार केला जात नाही.

अलिबाग तालुक्यात अलिबाग नगरपरिषद आणि ४० ग्रामपंचायतींना सध्या एमआयडीसी मार्फत पाणी पुरवठा केला जातो. आरसीएफ कंपनीच्या पाईप लाईनला जोडणी देऊन हा पाणी पुरवठा केला जातो. परंतु हे पाणी कमी पडत आहे. वाढत्या शहरीकरणाबरोबर या परिसारातील पाण्याची मागणी वाढत जाणार आहे. एमआयडीसीकडून येणार्या पाण्यावर पहिला हक्क औद्योगिक कंपन्यांचा असणार आहे. त्यानंतर उर्वरीत पाणी नागरीभागांना पुरविले जाईल. अलिबागा परिसारात भविष्यात काही उद्योग येणार आहेत. त्यामुळे एमआयडीसी उद्योगाना पाणी देऊन उर्वरीत पाणी जनतेला देईल. त्यामुळे भविष्यात पाण्याची समस्या निर्माण होणारच आहे.

भविष्यातील वाढती लोकसंख्या विचारात घेऊन पिण्याच्या पाण्यासाठी धारण बांधावी लागतील. प्रत्येक ग्रामपंचायतींमध्ये पाण्याचा स्रोत बळकट करण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. शक्य असेल त्या ग्रामपंचयातींमध्ये स्वतंत्र पाणीपुरवठा योजना राबवीणे हा एक चांगला पर्याय होऊ शकेल.

गाव तिथे डंपिंग ग्राऊंड, गाव तिथे घंटागाडी या सारख्या योजना राबवाव्या लागतील. ग्रामपंचायतींना घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रोत्साहीत करावे लागणार आहे. या ग्रामपंचायतीत कचरा व्यवस्थापनासाठी सक्षम यंत्रणा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. रायगड जिल्ह्यातील नगरपरिषदा व नगपंचयती यांच्यासाठी तसेच त्यांच्या आसपासच्या परिसरासाठी डंपिंगग्राऊड करिता जागा उपलबध्द होत नाहीत. त्या जागा शासनाने उपलबध्द करून दिल्यास किमान कचर्यादचे व्यवस्थान योग्यप्रकारे कराता येईल. त्यासाठी राज्य शासनाला धारणात्मक निर्णय घ्यावे लागतील.

# गायक डॉ. वसंतराव देशपांडे

वसंतराव देशपांडे हिंदुस्तानी शास्त्रीय आणि उपशास्त्रीय संगीत क्षेत्रातील आघाडीचे गायक होते. त्यांना संगीत नाटक अकादमीने पुरस्कार देऊन गौरविले होते. वसंतराव देशपांडे यांचा जन्म १९२० साली झाला. विदर्भातील एका देशस्थ ब्राह्मण कुटुंबात जन्मलेल्या वसंतरावांचे वडील श्रीमंत आणि जमीनदार होते. मात्र, वसंतराव लहान असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यानंतर वसंतरावांना घेऊन त्यांची आई सासरच्या घरातून बाहेर पडली. त्यांची काहीही चूक नसताना त्यांचा त्या घरातील हक्क नाकारण्यात आला.

वसंतराव लहान असतानाच सुप्रसिद्ध चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शक भालजी पेंढारकरांनी त्यांच्यातील कलागुण हेरले. त्यांना १९३५ साली प्रदर्शित झालेल्या कालियामर्दन या हिंदी चित्रपटात कृष्णाची भूमिका मिळाली. त्यानंतर वसंतराव कलाकार म्हणून उदयास आले. पुढे अनेक गुरुंकडून त्यांनी संगीताचे मार्गदर्शन घेतले. त्यांचे संगीताचे प्राथमिक शिक्षण नागपूरला शंकरराव सप्रे यांच्याकडे झाले. नंतरच्या काळात भेंडी बाजार घराण्याचे गायक अमान अली खान आणि अंजनीबाई मालपेकर, किराणा घराण्याचे गायक सुरेशबाबू माने, पतियाळा घराण्याचे असद अली खान आणि ग्वाल्हेर घराण्याचे रामकृष्णबुवा वझे अशा मातब्बर गायकांकडे त्यांना शिकायला मिळाले. मात्र, दीनानाथ मंगेशकरांच्या गायकीचा वसंतरावांच्या गाण्यावर मोठा प्रभाव होता. नामवंत दीनानाथ मराठी नाट्य कलाकार, नाट्य संगीत दिग्दर्शक आणि हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतातील मोठे नाव होते.

शास्त्रीय आणि उपशास्त्रीय संगीतात त्यांनी दाखवलेली प्रतिभा अजोड होती. गायनाबरोबरच ते उत्तम तबलावादक व पेटीवादकही होते. सरगम ही त्यांची एक विशेष खासियत होती. त्यांनी राज कल्याण हा राग तयार केला. हा एक यमन रागाचा प्रकार असून, यामध्ये पंचम वर्ज्य आहे. हिंदुस्तानी शास्त्रीय गायनातील ठुमरी, दादरा, गझल या प्रकारांवरही त्यांची हुकमत होती. लाहोरमध्ये शिक्षण घेत असताना ते ऊर्दू भाषा शिकले, त्याचा त्यांना गझल गायनासाठी उपयोग झाला.

देशपांडेंनी आपल्या गायनातील कौशल्य मराठी नाट्यसंगीत क्षेत्रातही दाखवून दिले होते. मेघ मल्हार, कट्यार काळजात घुसली, वीज म्हणाली धरतीला, हे बंध रेशमाचे, तुकाराम आणि वाऱ्यावरची वरात ही त्यांच्या अभिनय कारकिर्दीतील ठळक नावे. कट्यार काळजात घुसली या नाटकातील खान आफताब हुसेन खानसाहेब या भूमिकेने तर त्यांना मोठी लोकप्रियता मिळवून दिली. या नाटकाला लाभलेल्या उत्तुंग लोकप्रियतेमुळे ते पंडित वसंतराव देशपांडे या नावाने ओळखले जाऊ लागले.'मराठी नाट्यसंगीतांची वाटचाल' हा मराठी संगीत नाटकांचा इतिहास उलगडून दाखविणारा त्यांचा कार्यक्रमही खूप गाजला.

## बदलते तंत्रज्ञान


# काही सेकंदात गाडी आगीचा गोळा बनू शकते

अलिकडच्या काळात, देशभरात चालत्या गाड्यांमध्ये अचानक आग लागण्याच्या घटनांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. या घटना केवळ लोकांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत नाहीत, तर वाहनांच्या तांत्रिक त्रुटी आणि देखभालीतील निष्काळजीपणा जवाबदार आहे वाहन तज्ज्ञ टुटू धवन म्हणतात की, कारमध्ये आग लागण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे इलेक्ट्रिकल वायरिंगमधील बिघाड आणि इंधन गळती. जर गाडीची वेळेवर सर्व्हिसिंग केली नाही किंवा स्थानिक गॅरेजमधून आफ्टरमार्केट फिटिंग केले, तर आग लागण्याचा धोका अनेक पटींनी वाढतो. याशिवाय, अनेक वेळा लोक स्वस्त इलेक्ट्रॉनिक ॲक्सेसरीज किंवा अप्रशिक्षित तंत्रज्ञांकडून सीएनजी किट किंवा साउंड सिस्टमसारखे फिटिंग्ज बनवतात. यामुळे वायरिंगमध्ये शॉर्ट सर्किट होऊ शकते. त्याच वेळी, इंधन टाकी किंवा पाईपमध्ये थोडीशी गळती देखील इंजिनच्या उष्णतेच्या संपर्कात आल्यास आग लागू शकते.उष्णतेमध्ये बंद असलेली गाडी चालत्या ओव्हनमध्ये बदलते. अशा परिस्थितीत, उन्हाळ्यात कारमध्ये पॉवर बँक, लॅपटॉप, परफ्यूम आणि सॅनिटायझर ठेवल्याने धोका वाढू शकतो.पॉवर बँक आणि लॅपटॉप (बॅटरीवर चालणारी उपकरणे)ही उपकरणे लिथियम-आयन बॅटरीवर चालतात, ज्या जास्त तापमानात जास्त गरम होऊ शकतात आणि स्फोट होऊ शकतात किंवा आग पकडू शकतात. जर गाडी बंद करून पार्क केली, तर आतील तापमान लवकर ५०-६०AmoC किंवा त्याहून अधिक वाढू शकते, जे बॅटरीसाठी खूप धोकादायक आहे.



परफ्यूममध्ये अल्कोहोल असते, जे ज्वलनशील असते. उष्णतेमुळे परफ्यूमच्या बाटलीतील दाब वाढू शकतो आणि तिचा स्फोट होऊ शकतो किंवा ठिणगी पडल्यास त्यातील वायू बाहेर पडू शकतो आणि आग पकडू शकतो. सॅनिटायझरयामध्ये ७०% किंवा त्याहून अधिक अल्कोहोल असते, जे खूप ज्वलनशील असते. थेट सूर्यप्रकाश किंवा उष्णतेमध्ये सोडल्यास आग लागू शकते. इलेक्ट्रिक वायरिंग आणि बॅटरी नियमितपणे तपासा.जर पेट्रोल किंवा डिझेलचा वास येत असेल तर ते ताबडतोब मेकॅनिकला दाखवा. इंजिन आणि एक्झॉस्ट सिस्टमची देखभाल करत राहा. रेडिएटरमध्ये पुरेसे कुलंट व अग्निशामक यंत्र ठेवा

# चित्रमहर्षी भालजी पेंढारकर



**निमित्त**

विविध टेक्नोलॉजीचा वापर सध्या चित्रपटांमध्ये सहजपणे चित्रपट निर्माते करतात. पणज्या काळात केवळ नाटक अन् लोककलेमधून भारतातील लोकांचे मनोरंजन केले जात होते, त्याच काळात दादासाहेब फाळके यांनी चित्रपट निर्मितीचे तंत्र भारतात आणून भारतीयांना चित्रपटाची ओळख करुन दिली. म्हणूनच दादासाहेब फाळके यांना 'भारतीय चित्रपसृष्टीचे जनक' असं म्हटलं जातं. चित्रपटनिर्मितीसाठी दादासाहेब फाळके यांनी सर्वस्व वाहिले होते. त्यांचे आयुष्य हे देखील एका चित्रपटाप्रमाणेच होते. एखाद्या चित्रपटात एका नायकाच्या आयुष्यात जशी संकटं किंवा अडथळे येतात, त्याच प्रमाणे दादासाहेबांना देखील त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात अनेक कठीण प्रसंगाचा सामना करावा लागला होता.

भालजी पेंढारकर हे भारतीय चित्रपटसृष्टीचा पाया घालणार्या चित्रकर्मींमधले अग्रणी चित्रपट दिग्दर्शक, निर्माते, पटकथालेखक, संवादलेखक आणि गीतकार होते. त्यांचा जन्म २ मे १८९८ रोजी कोल्हापुरात झाला. चाकोरीबद्ध शालेय शिक्षणात मन न रमलेल्या भालजींनी तरुणवयातच कोल्हापूर सोडले. सुरुवातीच्या काळात पुण्यात केसरी या वृत्तपत्रात नोकरी, छत्रपती शाहूमहाराजांच्या रायबाग कॅम्पमध्ये वास्तव्य आणि सैन्यात भरती काहीशी अशी भटकंती करत ते कोल्हापूरला परतले. भालजी पुण्यात असताना त्यांनी केसरीचे अंक घरोघरी पोहोचवणे, विकणे अशी कामे केली; पण त्यातून उरलेल्या वेळात त्यांनी केसरीचे जुने अंक-विशेषतः लोकमान्य टिळकांचे जहाल अग्रलेख, चिपळूणकर, मोडक, विजापूरकरांच्या ग्रंथमाला, पुस्तके, चरित्रे असे साहित्य वाचले. त्यांच्यातल्या लेखकावर या सगळ्यांचे संस्कार झाले.

पुण्यातल्या 'लक्ष्मी' थिएटरचे व्यवस्थापक रुस्तमजी मोदी यांनी त्या काळी मूकपटांच्या वरच्या भागात इंग्रजी उपशीर्षकांची मराठी भाषांतरे देण्याची पद्धत सुरू केली होती. भालजींना वर्तमानपत्रात स्फुटे लिहिण्याबरोबरच हे मराठी भाषांतराचे कामही मिळाले. पुढे त्यांनी सिनेमा समाचारमधून चित्रपटांची परीक्षणेही लिहिली. १९२१ मध्ये भालजींनी संगीत कायदेभंग, भवितव्यता, क्रांतिकारक, राष्ट्रसंसार, आसुरी लालसा आणि अजिंक्यतारा ही सहा नाटके लिहिली, त्यांत अभिनयही केला.

लाईफ ऑफ ख्रिस्त हा मुकपट पाहिल्यानंतर दादासाहेब यांच्यामध्ये चित्रपट निर्मितीची आवड निर्माण झाली. त्यानंतर त्यांनी राजा हरिश्चंद्र या मराठी आणि भारतीय चित्रपटसृष्टीतील पहिल्या चित्रपटाची निर्मिती केली. राजा हरिश्चंद्र हा चित्रपट केवळ २० मिनीटांचा चित्रपट होता या चित्रपटाच्या निर्मिती दरम्यान त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. त्यांच्या नावानं भारतीय चित्रपसृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार म्हणजेच दादासाहेब फाळके पुरस्कार हा कलाकारांना दिला जातो. दादासाहेब फाळके यांच्यावर हरिश्चंद्रची फॅक्टरी या चित्रपटाचीनिर्मिती देखील करण्यात आली आहे. या चित्रपटात त्यांचा जीवनप्रवास दाखवण्यात आला आहे.अशा या श्रेष्ठ चित्रमहर्षीचे २६ नोव्हेंबर १९९४ रोजी निधन झाले.

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# किवी खाण्याचे आरोग्यास अनेक फायदे

किवी खाण्याचे आरोग्यासाठी अनेक फायदे आहेत रात्री झोपण्यापूर्वी किवी खाण्यामुळे सुरुवातीला झोपी गेल्यानंतर जागे होण्याच्या वेळेत ४७ टक्के घट होते सकाळच्या वेळी सतर्कता वाढते आणि कमी थकवा जाणवतोकिवी हे सेरोटोनिन समृद्ध असलेल्या काही फळांपैकी एक आहे. सेरोटोनिन जे एक न्यूरो ट्रान्समीटर आहे, जे मूड, विश्रांती व झोपेच्या चक्रांचे नियमन करते. सेरोटोनिन हे मेलाटोनिनचे पूर्वसूचकदेखील आहे, जे झोपेसाठी जबाबदार संप्रेरक(हॉर्मोन्स) आहे. कमी सेरोटोनिनची पातळी निद्रानाश, झोप लागत नाही व झोपेची गुणवत्ता खराब होते, असे गोयल यांनी सांगितले



किवी नैसर्गिकरीत्या सेरोटोनिनची पातळी वाढवून शरीराच्या अंतर्गत चक्राचे नियमन करण्यास मदत करू शकते.किवीमध्ये अँटिऑक्सिडंट्स असतात. विशेषतः व्हिटॅमिन सी आणि पॉलीफेनॉल असते, जे ऑक्सिडेटिव्ह ताण व दाहकता यांचा सामना करण्यास मदत करतात. अभ्यासातून असे दिसून आले आहे, ऑक्सिडेटिव्ह ताण झोपेच्या पद्धतींवर नकारात्मक परिणाम करू शकतो, ज्यामुळे झोप कमी होते आणि निद्रानाश होतो. किवीमध्ये उच्च अँटिऑक्सिडंट्स घटकांमुळे एकूण झोपेची गुणवत्ता चांगली होऊ शकते, असे गोयल सांगतात

फोलेट आणि झोपेचे नियमन किवी हा फोलेटचा एक चांगला स्रोत आहे. फोलेट हे बी व्हिटॅमिन आहे, जे मेंदूच्या कार्यात आणि न्यूरोट्रान्समीटर कार्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. फोलेटच्या कमतरतेमुळे निद्रानाश, रेस्टलेस लेग्ज सिंड्रोम व झोप टिकवून ठेवण्यास अडचण होते. किवीसारखे फोलेटयुक्त पदार्थ खाल्ल्याने झोपेचा त्रास टाळता येतो, असे गोयल यांनी सांगितलेकिवी हे पौष्टिक, कमी कॅलरीज असलेले फळ आहे, ज्यामध्ये झोप वाढवण्याचे गुणधर्म आहेत. जर तुम्हाला झोपेची समस्येचा त्रास जाणवत असेल, तर तुमच्या संध्याकाळच्या दिनचर्येत किवीचा समावेश करून पाहणे फायदेशीर ठरू शकते, असे गोयल सुचवतात.

परंतु, चांगल्या झोपेसाठी आणखी काही गोष्टींवर लक्ष केंद्रित करणेदेखील तितकेच महत्त्वाचे आहे,झोपेचे वेळापत्रक पाळण्यात सातत्य राहील असे पाहा.झोपण्यापूर्वी स्क्रीन टाइम कमी करा.रात्री कॅफिन आणि जड जेवण टाळा.

झोपण्याच्या वेळी आरामदायी दिनचर्या तयार करा.

# महाराष्ट्र दिनानिमित्त मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**




महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६६व्या वर्धापन दिनानिमित्त महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते पोलीस कवायत मैदान येथे आयोजित समारंभात राष्ट्रध्वज फडकविण्यात आला आणि राष्ट्रध्वजवंदन करण्यात आले.यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, पोलीस अधिक्षक अभिजित शिवथरे यांसह विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी,ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रगीतानंतर पोलीस वाद्यवृंद पथकाकडून महाराष्ट्र राज्यगीत धून वादन करण्यात आली. राष्ट्रध्वजाला पोलीस संचलनाद्वारे मानवंदना देण्यात आली. संचलनाचे नेतृत्व यांनी केले. पोलीस दल, राज्य राखीव पोलीस बल, वाहतूक शाखा, गृहरक्षक दल, गुन्हे शाखेचे श्वान पथक, पोलीस दलाचे डायल- ११२ पोलीस वाहन, दंगल नियंत्रण वाहन, जलद प्रतिसाद पथक, अग्नीशमन दल, वैद्यकीय सेवेच्या डायल १०८ सेवेतील वाहन आदींनी यावेळी संचलनात भाग घेतला.

राज्याला अधिक गतिमान करण्याचा प्रयत्न शासनाचा असून जिल्हा आणि राज्याच्या प्रगतीसाठी प्रत्येकाने योगदान द्यावे, असे आवाहन महिला व बालविकास मंत्री कु आदिती तटकरे यांनी महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६६ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित राष्ट्रध्वजवंदन कार्यक्रमात केले.

महाराष्ट्र राज्यच्या ६६ व्या वर्धापन दिनानिमीत्त तसेच कामगार दिनाच्या सर्वांना शुभेच्छा देऊन मंत्री तटकरे म्हणाल्या पंतप्रधान नरेंद्र मोदीजी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कुशल नेतृत्वाखाली आपल्या राज्याच्या विकासाचा अध्याय नव्याने सुरू झाला आहे. महाराष्ट्र सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहे. राज्य शासन गतिमान व सुशासनाचे ध्येय साध्य करण्यासाठी त्रिसूत्री कार्यक्रम राबवित आहे. राज्याचे कार्यक्षम मुख्यमंत्री. देवेंद्र फडणवीस यांनी १०० दिवसांत लोककल्याणासाठी राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांना गती देण्यासाठी सर्व विभागांच्या कामांना गती दिली आहे. मागील १०० दिवसांत जिल्ह्यात विविध विभागानी उत्कृष्ट कामगिरी बजावून प्रशासन अधिकाधिक लोकाभिमुख आणि गतिमान करण्यासाठी प्रयत्नशील आहे. महामुंबईचा विस्तार रायगड जिल्ह्याच्या दिशेने सुरू झाला आहे. ही बाब लक्षात घेऊन पायाभूत सुविधांचे नवे जाळे या परिसरात विणले जात आहे.

नवीन पिढीला रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच नव-उपक्रमांमध्ये राज्य अग्रेसर व्हावे, यासाठी नवी मुंबई येथे २५० एकर क्षेत्रावर नाविन्यता नगर, इनोव्हेशन सिटी, उभारण्यात येणार आहे. महाराष्ट्र सागरी विकास धोरण-२०२३मध्ये बंदर विकासाकरीता स्वामित्वधन, अकृषिक कर, वीज शुल्क, मुद्रांक शुल्क यातून सूट देण्यात आली आहे. जलवाहतूक व किनारी पर्यटनाला चालना देण्यासाठी प्रवासी व बंदर करातून सूट देण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले

## वन कट्टाचे उद्‌घाटन

**अलिबाग :** वनविभाग अलिबागतर्फे आयोजित वन कट्टा या अनोख्या उपक्रमाचे उद्घाटन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते संपन्न झाले.यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलीस अधिक्षक अभिजित शिवथरे, उप वनसंरक्षक राहुल पाटील यांसह विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारीउपस्थित होते.


## TENDER NOTICE

Sealed Tenders are invited from reputed contractors for building construction (R.C.C.,Brick work, Plaster, Plumbing & Electric work) for the Self redevelopment of Sudhamanjiri Co-Op. Housing Society Ltd. Tilak Road, Near Om Bakery, Panvel-410206(Regd. No. R.G.D/Panvel/H.S.G/T.C. 533 /89-90. Dt. 31-01-90)

- **Plot Area - 760 sqmt.**
- **Tender Cost-Rs.15,000/- (Non refundable)**
- **Tender Submission From- 03/05/2025 to 17/05/2025 at 07:00 pm**

The Applicants interested for the above referred works may contact Sudhamanjiri Co-Op. Housing Society Ltd. Tilak Road, Near Om Bakery, Panvel, Mobile No-+91 9987815838 on dates mentioned above during 10 am to 6 pm. PMA 9819595299 / 9967431535

Dated 30/04/2025

**Chairman / Secretary**
**Sudhamanjiri CHS Ltd.Tilak Road, Near Om Bakery,Panvel-410206**

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे बोरीपाखाडी, ता. उरण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे: बोरीपाखाडी, ता. उरण, जि. रायगड**

| अ.क्र | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| १. | ८६ | १/अ | एकुण क्षेत्र २-७८-०० |

सदर वर नमुद मिळकतीचे एकुण क्षेत्र २-७८-०० आमचे अशील, श्रीम. आयशा बिबी जवजे महंमद इसाक कारभारी याचे कडून विकत घेण्याचा व्यवहार झालेला आहे.

सदर मिळकतीचा खरेदीविक्रीचा व्यवहार आमचे अशीलाशी झालेला असल्यामुळे यापुढे श्रीम. आयशा बिबी जवजे महंमद इसाक कारभारी व त्यांचे वालीवारस यांचे सोबत सदर मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारे हस्तांतरणाचा व्यवहार करू नये, अगर तसे केल्यास आमचे अशीलावर सदरचा व्यवहार बंधनकारक राहणार नाही तसेच सदर मिळकतीबाबत व्यवहार श्रीम. आयशा विबी जवजे महंमद इसाक कारभारी व त्यांचे वालीवारस यांचे सोबत केल्यास, तुमचे वर योग्य ती कारवाई करतील याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

उरण
दिनांक : ०१/०५/२०२५

सही/-
सौ. वैशाली अ. प्रधान
ॲडव्होकेट व नोटरी उरण
ऑफिस पत्ता: शॉप नं. १, अर्श टॉवर, उरण सिव्हील कोर्टाचे बाजुला, ता. उरण, जि. रायगड- ४००७०२
मोबाइल नं. ९८२०३००६१०

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सिताराम रामा महादे, रा. पिसार्वे, तळोजा ए. वी. ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०८ यांचेकडून विकसनाकरीता घेत असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतीचे मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-पिसार्वे, ता. पनवेल, जि. रायगड**

| गट नं/सर्व्हे नं. | एकूण क्षेत्र (हे.आर) (पोटखराब्यासह) | आकार (रु.पै) |
|---|---|---|
| ८६/३/अ | ०-१४-५०<br>पैकी विकसनकरीता घेतलेले<br>खालील नमूद क्षेत्र<br>०-१०-०० | २.३४ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकाने आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत विकसन करार करून देणार आहेत. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (०७) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली.
दिनांक : ०२/०५/२०२५

सही/-
ॲड. स्नेहल विजयकुमार बजाज
मु. पो. पाली, ता.सुधागड, जि.रायगड
पिन ४१०२०५, मो. ८८६२०३५२०३

## PANVEL MUNICIPAL CORPORATION, PANVEL

### NOTICE INVITING TENDERS

Online bids are invited from bidders to perform of the following work on behalf of the Commissioner, Panvel Municipal Corporation, Panvel (here-in-after called the CORPORATION) and will be received online on the website www.mahatenders.gov.in as per time schedule (key dates) in the notice published on the above website.

| Sr. No. | Name of Work | Earnest Money (Rs.) | Cost of tender form (Rs.) | Period of work |
|---|---|---|---|---|
| 1. | Tender for Procurement of 20 Nos of LFP Battery-operated Vacuum based suction Litter picker machine of 240 liters capacity in jurisdiction of Panvel Municipal Corporation with Comprehensive Maintenance Package up to 5 years | Rs.3,27,514 | 3000/-+18% G.S.T. | 12 months |

**Key Dates: -**

| Sr. No | Description | Date & Time |
|---|---|---|
| 1 | Publish Date | 02/05/2025 |
| 2 | Document Download Start Date | 02/05/2025 at 15.00 |
| 3 | Document Download End Date | 13/05/2025 Upto 15.00 |
| 4 | Pre-Bid Meeting | 06/05/2025 at 12.00 |
| 5 | Bid Submission start date | 02/05/2025 at 15.00 |
| 6 | Bid Submission end date | 13/05/2025 Upto 15.00 |
| 7 | Bid opening date | 14/05/2025 at 15.00 |

Tender Notice No.: PMC/SWM/2525/Sr.No.28/265/2025
Dated: 1/05/2025

sd/-
Additional Commissioner
Panvel Municipal Corporation

पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.१८०/१८५/२०२५

सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(वाटपपत्र / करारनामा)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधिताना भूखंडाचे **वाटपपत्र/करारनामा** प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र हे.आर. | मंजूर पात्रता (चौ.मी.) | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **मौजे खारघर ता.पनवेल, जि.रायगड** | | | | |
| १ | **५९९A खारघर** | ओवे १२ | १४२/२<br>१४२/१ब | ०-५३-७<br>०-२९-३ | ७५० चौ.मी. पैकी १०० | भूखंड क्र.४६E, सेक्टर-३४A, क्षेत्र -१०० चौ.मी. | मुजम्मील अब्दुल मजिद पटेल | मा. दिवाणी न्यायाधिश क्र. स्तर यांच्या न्यायालयातील दावा क्र. स्पे.मु.क्र.४८४/२०२३ |
| | | | एकुण | **०-८३-०** | | | | |
| | | | | **नोड- द्रोणागिरी** | | | | |
| २ | **१११६ द्रोणागिरी** | चाणजे ७२७/२८ ७९/२४३ | १७२/१<br>१७४/७ | ०-२४-५<br>०-४२-६<br>०-६७-१ | ५८७.१२ चौ.मी. पुर्णांकात ६०० चौ.मी. | द्रोणागिरी भूखंड क्र. १००, सेक्टर - ५२, क्षेत्र -५९९.८१ चौ.मी. | भूधारक १. कै. लक्ष्मण राघो घरत (मयत) व कै. हिराबाई लक्ष्मण घरत (मयत), यांचे वारस- १) श्रीमती सुजाता सतिश भावसार २) श्रीमती सुष्मा जीवन म्हात्रे | निरंक |
| | | | | **ता.पनवेल, जि.रायगड** | | | | |
| ३ | **आसुडगाव ९९** | २३/१(२)<br><br><br><br><br>२/क | ७/१२, ९/३<br>१२/४<br>१२/६A<br>१२/९p<br>२१/११A<br>१०१-३ | ०-४८-९<br>०-०७-८<br>०-३६-४<br>०-२२-३<br>०-२६-०<br>०-१८-२ | १४५० चौ.मी. पैकी १५० चौ.मी. | भूखंड क्र. ५७ बी, सेक्टर - १२, क्षेत्र - १५० चौ.मी. कामोठे नोड | कै. आंबो काथारी नाईक (मयत) यांचे वारस कै. किसन आंबो नाईक (मयत), यांचे वारस- १.श्रीमती सुभद्रा किसन नाईक २. श्री रोशन किसन नाईक ३. श्री ज्ञानेश्वर किसन नाईक ४.श्रीमती दिपाली महेश गायकर ५. श्रीमती विनिता अनंत जले | निरंक |
| ४ | **काळुंद्रे**<br>**काळुंद्रे**<br>**काळुंद्रे** | १३८(१६१) -अ<br>१८८(२११)<br>६५(७३) (७५) | २०/१ व इतर<br>२९/३<br>११/२पै ३०/पै | ०-९५-३<br>०-२८-०<br>०-६१-५ | १६०० चौ.मी. मंजुर पैकी ८५० चौ.मी. | नोड- करंजाडे भूखंड क्र. ६१, सेक्टर - ५A, क्षेत्र - ८३६.२८ चौ.मी. | कै. रामा विठू म्हसकर (मयत) व कै. सिताबाई रामा म्हसकर (मयत) यांचे वारस १. श्री. दगडू रामा म्हसकर २. श्री. रविंद्र रामा म्हसकर ३. श्रीमती शोभा मधुकर म्हसकर ४. श्री. अविनाश मधुकर म्हसकर ५. श्री. भास्कर मधुकर म्हसकर ६. श्रीमती लता जगदिश म्हसकर ७. श्री. प्रथमेश जगदिश म्हसकर ८. श्रीमती सुनिता विश्वनाथ म्हसकर | |
| | | | | **१-८४-८** | | | | |
| ५ | **१०४- JNPT** | शेवे १५८ १५८/२०१/१ | १५१/३९<br>१५९/२७<br>१५९/३ | ०-०६-०<br>०-१२-०<br>०-२३-० | २७४१ चौ.मी. | नोड जे.एन.पी.टी, सेक्टर क्र. D-२ भूखंड क्र. ५६, क्षेत्र-२७४१ चौ.मी. | १) पांडुरंग गोपाळ घरत, २) हिराबाई मोरेश्वर म्हात्रे उर्फ हिराबाई गोपाळ घरत, ३) वसंत गोपाळ घरत, ४) सुभाष पांडुरंग भोईर, ५) श्री. सतिश जनार्दन सुतार ६) नारायण सावळाराम भोईर, ७) श्रीमती. मथुराबाई वासुदेव पाटील, ८) श्री. गजानन पदमण उर्फ पदमाकर ठाकूर, ९) श्री. चंद्रकांत पदमण उर्फ पदमाकर ठाकूर, १०) श्री. हिरालाल हरी पाटील, ११) श्रीमती. ललिता हरी पाटील १२) श्री. सुरेश सखाराम भोईर, १३) तुकाराम हरी भोईर, १४) एकनाथ प्रभाकर भोईर, १५) वसंत पांडुरंग पाटील | निरंक |
| | | शेवे १५८ १५८/२०१/II | ११९/२२<br>१६९अ/१५<br>१२५अ/१५<br>१२७/१०<br>१९०/३ | ०-६-०<br>०-६-३<br>०-१-५<br>०-४-८<br>०-१-५ | | | | |
| | | शेवे १०७ १०७/II | १५१/३४ | ०-१९-० | | | | |
| | | शेवे१०७ १०७/I | १९१/२४<br>१९१/२६ | ०-१९-०<br>०-९-० | | | | |
| | | शेवे१०७ १०७/III | १९०/१ | ०-४-० | | | | |
| | | शेवे ५७ ५७/१ | १५१/८<br>१५१/२३<br>१५१/३७ | ०-७-०<br>०-२५-०<br>०-९-० | | | | |
| | | शेवे५७ ५७/२ | १६९अ/११<br>१६९अ/१४<br>१६९अ/११<br>१९३/११<br>८३/२<br>८७/४<br>१०७/४<br>११९/२५<br>१२५अ/१४<br>१५०/१२ | ०-४-५<br>०-७-१<br>०-१-५<br>०-२३-०<br>०-६-१<br>०-३-३<br>०-१३-०<br>०-९-०<br>०-८-६<br>०-१८-० | | | | |
| | | शेवे २०३/८७/I | ३/१०<br>३/१३<br>७/६<br>३४/५<br>३७/१<br>४०/१०<br>४१/१२ | ०-६-०<br>०-८-०<br>०-९-०<br>०-४-०<br>०-१-०<br>०-८-०<br>०-२-५ | | | | |
| | | शेवे२०३/८७/II | ८/१० | ०-३-५ | | | | |
| | | शेवे २०३/८७/III | १५/१<br>१८/६<br>१८/३५<br>३३/२<br>३३/७<br>३३/११ | ०-९-०<br>०-१८-०<br>०-१-०<br>०-१४-०<br>०-१०-०<br>०-२८-० | | | | |
| | | शेवे २०३/८७/IV | ९/५<br>२१/१३<br>२२/२<br>२२/४<br>३०/५<br>३२/६<br>५०/२२<br>८८/१<br>१०/१५<br>१४/९ | ०-१-८<br>०-१-८<br>०-४-८<br>०-६-१<br>०-२-४<br>०-४-०<br>०-३-५<br>०-४-३<br>०-१८-०<br>०-४-८ | | | | |
| | | एकुण | | **४-२०-७** | | | | |
| | | | | एकुण पात्रता | **२७४१** चौ.मी. | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिद्धी झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सुचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निर्दशनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :-** **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (ठाणे/रायगड)**
**१२.५ टक्के भूमी विभाग,**
**सिडको भवन, तळ मजला,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/०४८/२०२५-२६

# महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा



पनवेल : रायगड जिल्हा परिषदेच्या कोपर (खारकोपर) येथील प्राथमिक शाळेत महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत यांच्या हस्ते झेंडा फडकविण्यात आला. या कार्यक्रमाला अनंता ठाकूर, पि.के. घरत, रघुनाथ देशमुख, अनुसया घरत, नंदा भोईर, आनंदी घरत, इंदुताई म्हात्रे आदी उपस्थित होते.

## कळंबोलीत कोकण विभागाचे ध्वजारोहण

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र दिनाच्या ६६व्या वर्धापन दिनानिमित्त, कोकण विभागाचे मुख्य ध्वजारोहण कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांच्या हस्ते कळंबोली येथील नवी मुंबई पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर मोठ्या उत्साहात झाला.

या वेळी कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांनी उपस्थित मान्यवर, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांना महाराष्ट्र दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. या समारंभाला नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, नवी मुंबई महापालिका आयुक्त कैलास शिंदे, पोलीस सहआयुक्त एस.डी. एनपुरे, वीरपत्नी जनाबाई पार्टे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

समारंभात विविध पोलीस व आपत्कालीन सेवांच्या पथकांनी संचलनाद्वारे राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. उल्लेखनीय सेवेसाठी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरवही करण्यात आला. या कार्यक्रमास कोकण विभागाचे अतिरिक्त विभागीय आयुक्त विकास पानसरे, अपर आयुक्त (महसूल) वैशाली इंदाणी-उंटवाल, अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) राजलक्ष्मी शहा, उप आयुक्त मिनल कुटे, उप आयुक्त प्रमोद केंभवी, सह आयुक्त दादासाहेब कांबळे, करमणूक शुल्क विभागाचे सह आयुक्त रविंद्र पवार, तसेच वैद्यकीय अधिकारी डॉ. गणेश धुमाळ आदी विविध शासकीय अधिकारी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन शुभांगी पाटील आणि निंबाजी गीते यांनी केले.




## कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमांतर्गत पनवेल, नवी मुंबई मनपा राज्यात तृतीय

**पनवेल, नवी मुंबई : बातमीदार**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा विशेष कार्यक्रमांतर्गत कृती आराखडयानुसार क्षेत्रीय कार्यालयांनी केलेल्या कामाचे मूल्यमापन करून उत्तम कामगिरी केलेल्या कार्यालयांची सूची जाहीर करण्यात आली आहे. त्यामध्ये महानगरपालिकांच्या गटात पनवेल व नवी मुंबई महानगरपालिकेस तृतीय क्रमांकाचे मानांकन जाहीर झालेले आहे.

अंतिम फेरीत निवड झालेल्या सहा महानगरपालिकांचे मूल्यमापन क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया या मान्यताप्राप्त त्रयस्थ संस्थेमार्फत करण्यात आले होते. कृती आराखडयाच्या कार्यक्रमातील वेबसाईट सुधारणा, कार्यालयीन सोयीसुविधा, तक्रार निवारण, सुलभ जीवनमान, गुंतवणुकीस चालना, तंत्रज्ञानाचा वापर अशा विविध १० मुद्यांवर दोन्ही महानगरपालिकेच्या सर्वच विभागांमध्ये कार्यालयीन स्वच्छता, नीटनेटकेपणा यापासून नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवांमधील सुलभता अशा बाबींवर लक्षणीय काम करण्यात आले.

१०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणांच्या विशेष मोहीमेंतर्गत पनवेल व नवी मुंबई महानगरपालिकेने केलेल्या कामाची दखल राज्य पातळीवर तृतीय क्रमांकाने घेण्यात आली असून ही नवी येथील नागरिकांसाठी अत्यंत अभिमानाची गोष्ट असल्याचे दोन्ही महापालिकेच्या वतीने सांगण्यात आले आहे.






पनवेल : न्हावेखाडी येथील श्री म्हसेश्वर मंदिर कमिटीचे अध्यक्ष सी.एल.ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत, माजी सदस्या योगिता भगत, जयवंत देशमुख, गजानन ठाकूर, बाळू कोळी, मदन ठाकूर, विश्वनाथ कोळी, सुधीर ठाकूर, सुहास भगत, वामनशेठ म्हात्रे आदी उपस्थित होते.

## पनवेलमधील हुतात्मा स्मारक उद्यानात ध्वजवंदन

**पनवेल : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६६ व्या वर्धापन दिनानिमित्त आज पनवेल येथील हुतात्मा स्मारकावर ध्वजवंदन सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यात स्वातंत्र्यसैनिकांचे उत्तराधिकारी भरतसिंह प्रल्हादसिंह परदेशी यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

या वेळी पनवेल महापालिकेच्या अग्निशमन व सुरक्षा विभागामार्फत तसेच पोलीस दलामार्फत ध्वजास मानवंदना देण्यात आली. या वेळी महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, माझी नगरसेवक, नगरसेविका ज्येष्ठ नागरिक तसेच उपायुक्त सर्वश्री डॉ. वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, रविकिरण घोडके, मंगला माळवे, स्वरूप खारगे, सहायक आयुक्त श्रीराम पवार, डॉ. रूपाली माने, सुबोध ठाणेकर, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर तसेच महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



## 'सीकेटी'त वाय.टी. देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सीकेटी विद्यालयात महाराष्ट्र दिनी जेबीएसपी संस्थेचे उपकार्याध्यक्ष वाय. टी. देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या वेळी संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे, मुख्याध्यापक कैलास सत्रे, प्राचार्य प्रशांत मोरे, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, सुभाष मानकर, नीलिमा शिंदे, पर्यवेक्षिका निरजा अधूरी, वैशाली पारधी, स्वाती पाटील, अजित सोनवणे, कैलास म्हात्रे तसेच संकुलातील सर्व शिक्षक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.





पनवेल : भाजप ओबीसी मोर्चाचे शहर अध्यक्ष रामनाथ पाटील यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी ज्येष्ठ नेते नितीन विचारे, खांदा कॉलनी विभागीय सरचिटणीस संजय कांबळे, नामदेव कोरे, बुथ अध्यक्ष गोपाळ स्वामी, प्रकाश मुळीक महाराज आदी उपस्थित होते.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात संजय भगत यांच्या हस्ते ध्वजारोहण



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य संजय भगत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या ध्वजारोहण सोहळ्यासाठी रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे, रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, खारघरच्या मुख्याध्यापिका निशा नायर रामशेठ ठाकूर महाविद्यालय, खारघरचे सीडीसी मेंबर प्रभाकर जोशी, अनिल खोपडे, जयदास तेलवणे तसेच महाविद्यालयात सर्व विभागाचे विभाग प्रमुख, समिती प्रमुख, रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी हे सर्व या ध्वजारोहण कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन मुख्य लिपिक नितीन वासकर, अजिंक्य भगत, (फिजिकल डायरेक्टर) व प्रा. प्रथमेश उदेकर यांनी केले व रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील व रामशेठ ठाकूर महाविद्यालयात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहुन सहकार्य केले. सूत्रसंचालन प्रा. नंदकुमार भोईर यांनी केले तसेच कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांचे आभार मानले.



उरण : महाराष्ट्र दिनानिमित्त नगर परिषद मुख्याधिकारी समीर जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी लेखापाल सुरेश पोसतांडेल, नगर अभियंता निखील ढोरे, नगर रचनाकार बिपीन निकम, लेखा परीक्षक गोविंदा कांबळे, आरोग्य निरीक्षक हरेश तेजी, माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, माजी नगरसेवक कौशिक शाह, राजेश ठाकूर, झुंबर माने, जगदीश म्हात्रे, विशाल गायकवाड, जयराम पाटील, महेंद्र साळवी, नरेंद्र उभारे, हरेश जाधव, हर्षद कांबळे, संजय पवार, विजय पवार आदी उपस्थित होते.

## निवडक

### ब्राह्मण सभेत परशुराम जयंती

**रसायनी :** ब्राह्मण सभेत परशुराम जयंती साजरी करण्यात आली. मंगळवारी भगवान परशुराम जयंतीनिमित्त रसायनी ब्राह्मण संघातर्फे जन्मोत्सव साजरा करण्यात आले. रसायनी ब्राह्मण संघाचे अध्यक्ष विष्णू श्रीराम जोगळेकर यांनी कार्यक्रमाची जबाबदारी पार पाडली. जन्मोत्स्वाचे प्रसाद विनय सोहनी आणि त्यांच्या सौ. सोहनी यांनी बनवून वाटप केले.

### आपटा हद्दीत आढळला मृतदेह

**रसायनी :** आपटा गावाच्या हद्दीत नदीकिनारी असलेल्या करंजाच्या झाडाखाली बुधवारी (दि.३०) एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. याबाबतची खबर आपट्याचे पोलीस पाटील यांनी दिली होती. मयत व्यक्ती ३५ ते ४० वयोगटातील अनोळखी असून नाव पत्ता माहीत नाही. पोलीस हवालदार कांबळे आणि तपास अधिकारी पी.टी. माळी हे ज्येष्ठ अधिकारी संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाची पुढील तपास करीत आहेत.

### उरणमध्ये चित्रकला प्रदर्शन

**उरण :** उरणमधील आर्ट क्रियेशन या फाईन आर्ट अकॅडेमी मार्फत २ ते ४ मे रोजी विद्यार्थ्यांच्या ३०० चित्रांचे प्रदर्शन राम मंदिर हॉल येथे भरवण्यात येणार आहे.



पनवेल : करंजाडे गावाचे पोलीस पाटील कुणाल लोंढे यांची कन्या श्रोणवी लोंढे ही महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे माध्यमिक परीक्षेत आठवीमध्ये मेरिटमध्ये उत्तीर्ण झाली आहे. याबद्दल तिचे सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील यांनी अभिनंदन केले. सोबत कुणाल लोंढे.




# रोह्यात काही गावांमध्ये पाणीटंचाई

## भातसई ते धोंडखारदरम्यान टँकरने जलपुरवठा

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात मुसळधार पडणारा पाऊस, उपलब्ध असलेला मुबलक पाणीसाठा व बारमाही वाहणारी कुंडलिका नदी असतानाही रोहा तालुक्यातील काही गावांना मार्चपासूनच पाणीटंचाई भासत आहे. मार्च ते मे महिन्यापर्यंत गावांना पाण्यासाठी हाल सोसावे लागणार आहे.




उन्हाळा सुरू झाल्यापासून रोहा तालुक्यातील काही गावांना पाणीटंचाई भासू लागल्याने या गावांना टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्यात येत आहे. यातील पश्चिम खोऱ्यातील काही गावांना एमआयडीसीच्या माध्यमातून टँकरने पाणीपुरवठा होत आहे.

रोहा पंचायत समितीच्या वतीने उन्हाळ्यात पाणीटंचाई भासणाऱ्या गावांचा पाणीटंचाई निवारण कृतीमुळे आराखडा तयार करण्यात आला आहे. यामध्ये उसर ठाकरवाडी, पिंगळसई साळवीवाडा, पिंगळसई आदिवासीवाडी, वराठी, आंबिवली आदिवासीवाडी, टिटवी, कोलाड म्हसरवाडी, तिसे, पहुर वाळंजवाडी, धामणसई, गावठाण, शेणवई, डोंगरी, शेणवईवाडी, वावेखार, वावेपोटगे, दापोली, करंजवीरा, धोंडखार तर्फे उमटे या गावांचा समावेश आहे. यामध्ये काही गावांचा समावेश नाही पाणीटंचाई गावांनी टँकरची मागणी केल्यास त्यांना टँकरने पाणी पूरविण्यात येईल, असे पंचायत समितीच्या वतीने सांगण्यात येत आहे.

रोहा तालुक्यातील पश्चिम खोऱ्यातील भातसई ते धोंडखार या गावांना एमआयडीसीच्यावतीने टँकरने पाणीपुरवठा करण्यात येतो. किमान १५ च्यावर फेऱ्या या गावाला टँकरच्या होत असतात, पण त्या गावांना तीव्र पाणी असल्याने किमान सात ते आठ हंडे पाणी पिण्यास मिळत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. पश्चिम खोऱ्यात २६ गाव पाणीपुरवठा योजनेचे पाणी वेळेवर मिळत नसल्याने व कमी दाबाने येत असल्याने हे पाणी संपूर्ण पुढील गावापर्यंत जात नाही.

रोहा तालुक्यात शेकडो योजना नळ पाणीपुरवठ्याच्या झाले आहेत, परंतु नियोजन अभावी व ठेकेदारांचे हीत पाहिल्याने काही ठिकाणी योजना अकार्यक्षमपणे काम करत असल्याने त्यातील गावांना पाणीटंचाईला आता तोंड द्यावे लागत आहे. मध्यंतरी या भागातील महिलांनी मोर्चा, उपोषणे, आंदोलने केली. परंतु पश्चिम खोऱ्यातील गावांना पाणी योजना सुरळीत सुरू व्हावी, अशी मागणी होत आहे.

# सुट्ट्यांमुळे महामार्गांवर वाहतूक कोंडी

**खोपोली : प्रतिनिधी**

जोरात सुरू असलेली लग्न सराई , शाळा, महाविद्यालयाना लागलेल्या उन्हाळी सुट्या व १ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनाची पडलेली सुट्टी त्यानंतर येणारा शनिवार व रविवार अशा सलग शासकीय सुट्याचा पार्श्वभूमीवर गुरुवारी एक्स्प्रेस वे सोबत पेण व पाली रस्त्यावर ही मोठ्या प्रमाणात वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.



वाहतूक कोंडी सोडवून वाहतूक सामान्य ठेवण्यात वाहतूक पोलीस यंत्रणांची चांगलीच धावपळ उडाली होती.

१ मे गुरुवारी मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर वाहनांची गर्दी वाढल्याने अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी निर्माण झाली . खालापूर टोल नाका ते खंडाळा घाट ते खंडाळा प्रवेश या अंतरात वाहनांच्या लांबचलांब रांगा लागल्या. याचदरम्यान अवजड वाहने ही ट्रक टर्मिनल्स मध्ये न थांबता एक्स्प्रेस वे वर आल्याने वाहतूक कोंडीत अधिक भर पडली होती, मात्र आयआरबी डेल्टा फोर्स व महामार्ग वाहतूक पोलीसांनी तत्काळ उपाययोजना करून काही अंशी कोंडी फोडून वाहतूक सामान्य केली.

तालुक्यातील खोपोली-पेण, खोपोली-पाली मार्गे विविध वॉटर पार्क, पर्यटनस्थळे व समुद्र किनाऱ्यांवर जाणाऱ्या पर्यटकांच्या वाढलेल्या वाहनांमुळे याही रस्त्यांवर गुरुवारी सकाळपासून वाहतूक कोंडी निर्माण होत होती. एक्सप्रेस वे व इतर सर्व प्रमुख रस्त्यांवर पुढील चार पाच दिवस अशीच वाहनांची गर्दी राहणार असून वाहतूक कोंडी व अपघात रोखण्यासाठी वाहतूक पोलीस, आयआरबी यंत्रणा, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सक्रिय ग्रुपचे सदस्य सतत कार्यरत आहेत.

# आमदार महेंद्र दळवींच्या हस्ते भात गिरणीचे उद्घाटन




**मुरुड : प्रतिनिधी**

आंबोली जोसरांजण रस्त्यावर तिरुपती बालाजी राईस मिलचे उद्घाटन अलिबाग मुरूड विधानसभा क्षेत्राचे आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले.

शिवसेनेच्या राजपुरी जिल्हा परिषद गणाच्या संपर्क प्रमुख जीविता मिणमीने यांनी जिल्हा उद्योग केंद्राकडून पंतप्रधान रोजगार योजने अंतर्गत ६५ लाखांचे कर्ज घेऊन या भागात ही मोठी भात गिरण उभी करून उद्योग क्षेत्रात पदार्पण केले आहे. या भात गिरणीमुळे असंख्य शेतकरी बांधवांना मोठा दिलासा मिळणार आहे.

या उद्घाटन कार्यक्रमासाठी शिवसेनेचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष भरत बेलोसे, मुरूड तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, जिल्हा नियोजन मंडळ सदस्य नीलेश घाटवल, सागर चौलकर, शिवसेनेचे मुरुड तालुका बांधकाम अध्यक्ष दिनेश मिणमीने, जीविता मिणमीने आदींसह असंख्य कार्यकर्ते मोठ्या संखेने उपस्थित होते.

या वेळी आमदार महेंद्र दळवी यांनी सांगितले की, यश व प्रगती होण्यासाठी कष्ट करण्याची तयारी सुधा असावी लागते.कोणत्याही व्यवसायात गुंतवणूक केल्यावर चांगला प्रतिसाद लगेच मिळत नसतो तर थोडी प्रतिक्षा केली की व्यवसायात यश मिळत असते.

दिनेश व जीविता मिणमीने कुटुंब यांना राईस मिल क्षेत्रात निश्चित यश मिळेल माझ्या शुभेछा सदैव त्याच्या पाठीशी राहतील असा विश्वास या वेळी आमदार दळवी यांनी व्यक्त केला. या वेळी या उद्घाटनावेळी ग्रामीण भागातील जनतेसाठी योगीराज महाराज यांचे कीर्तनसुद्धा ठेवण्यात आले होते.

# खालापुरात दोन अपघात; एक ठार, एक जखमी

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खालापुरात झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात एकाचा मृत्यू तर एक गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे.



पहिला अपघात हा खोपोली पेण मार्गावर वडवळ टोल नाक्यावर घडला बुधवारी रात्री सव्वादहा वाजण्याच्या सुमारास खोपोलीहून पेणच्या दिशेने जाणारी पेण खोपोली एसटी खालापूर हद्दीत वडवळ टोल नाक्यावर आली असताना टोल नाक्यावरील लोखंडी खांबाला धडकली. यामध्ये एसटीच्या पुढील भागाचा चक्काचूर होवून चालक जखमी झाला. एसटीमध्ये दहा ते बारा प्रवासी आणि वाहक होता. जखमी चालकाला स्थानिकांनी तातडीने वावोशी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल केले. पोलिसांनी घटनास्थळी जात अपघातग्रस्त एसटी बाजूला केल्याने वाहतूक सुरळीत झाली. दुसरा अपघात मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर बुधवारी रात्री साडेअकराच्या सुमारास आडोशी गावाचे हद्दीत घडला. मालवाहक टेम्पोवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने पुढे जाणाऱ्या वाहनाला धडकून टेम्पोच्या केबिनचा भाग दबला. यामध्ये चालक जागीच ठार झाला. बोरघाट वाहतूक पोलीस मदत केंद्र आयआरबी देवदूत पथकाने अपघातग्रस्त टेम्पो बाजूला करून वाहतूक सुरळीत केली.

# मुरूडमध्ये महाराष्ट्र दिन उत्साहात

**मुरूड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचा ६५ वा वर्धापन दिनानिमित्त मुरुड जंजिरा नगरपरिषद कार्यालयातील प्रांगणात प्रशासक तथा मुख्याधिकारी-सचिन बच्छाव यांच्याहस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून सकाळी ७ वाजता ध्वजारोहण करण्यात आले.

या वेळी मुख्याधिकारी सचिन बच्छाव, प्रशासकीय अधिकारी-नदंकुमार आबंतेकर, सतेज निमकर, कपिल वेहेले, पांडुरंग आरेकर, मसाल सर, प्रमोद भायदे, प्रकाश आरेकर, प्रशांत दिवेकर, अनिकेत वाजे , अनिकेत जगदाळे ,अनिकेत भोसले, सुदेश माळी, नयन कर्णिक,सतिष जंजिरकर, नैनिता कर्णिक, दिपाली दिवेकर, पल्लवी डोंगरीकर,अक्षता तुळसकर, स्वप्नजा विरकुड, जयेश चोडणेकर, निलेश शेंडगे,अभि चांदोरकर, ओमकार पोतदार, दिपक शिंदे, विजय सुर्वे आदिंसह अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचे मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते उद्घाटन



**रायगड : रामप्रहर वृत्त**

राज्यातील आर्थिकदृष्ट्या गरजू रुग्णांना आर्थिक सहाय्य करण्याकरिता रायगड जिल्हाधिकारी कार्यालयात सुरु करण्यात आलेल्या 'मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

या वेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा शल्य चिकित्सक निशिकांत पाटील, अतिरिक्त शल्य चिकित्सक शीतल जोशी, उपजिल्हाधिकारी डॉ.रविंद्र शेळके यांसह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

राज्यातील गरजू रूग्णांना उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून आर्थिक मदत पुरवली जाते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सुरू करण्यासंदर्भात २२ फेब्रुवारी २०२५ रोजी शासन निर्णय काढण्यात आला. शिवाय, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाची २३ एप्रिल रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली होती, या बैठकीत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष पुर्ण क्षमतेने कार्यान्वयित करणेबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यलयात हा कक्ष सुरू करण्यात आला आहे.

वैद्यकीय उपचासाठी मदत मिळावी याकरिता गरजू रूग्ण व त्यांचे नातेवाईक मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडे मोठ्या प्रमाणात अर्ज करत असतात. अर्जाचा पाठपुरावा करण्यासाठी ते मंत्रालयात वारंवार येतात. रूग्ण व नातेवाईकांना होणारा त्रास लक्षात घेवून मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दुरदृष्टीतून रूग्ण व नातेवाईकांची परवड थांबविण्याच्या उद्देशातून सदरचा कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

### *काय असणार कक्षाची जबाबदारी?*

**अर्ज करण्यासाठी रूग्ण व नातेवाईकांना मदत करणे. प्राप्त अर्जाची सद्यस्थिती उपलब्ध करुन देणे. रूग्ण व नातेवाईकांच्या समस्यांचे निराकरण करणे. आर्थिक मदत झालेल्या रुग्णांची रुग्णालयात जाऊन भेट घेणे. नागरिकांमध्ये कक्षा बाबत जनजागृती आणि प्रसिद्धी करणे.कक्षामार्फत अर्थसहाय्य देण्याकरिता आजारांचे पुनर्विलोकन करणे. जिल्ह्यातील आपत्तीच्या ठिकाणी भेटी देणे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीला अधिकाधिक देणग्यांचा ओघ येण्याकरिता प्रयत्न करणे. अर्थसहाय्य देण्यात येणाऱ्या आजारांच्या संख्येत वाढ करण्यासाठी प्रयत्न करणे. रूग्ण व नातेवाईकांना होणार कक्षाचे फायदे. रूग्ण व नातेवाईकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाला अर्ज करण्याकरिता मदत मिळणार. अर्जासाठी आवश्यक कागदपत्रांची यादी, माहिती सहज उपलब्ध होणार. संलग्न रूग्णालयांची यादी मिळणार. अर्ज किंवा पाठपुरावा करण्यासाठी मंत्रालयात जाण्याची गरज भासणार नाही.**

# मुख्याध्यापक शरद निकुंभ यांना सेवानिरोप

**नागोठणे : बातमीदार**


सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्ष गीताताई पारलेचा यांनी काढले. सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या आत्मोन्नती विद्यामंदिर जांभुळपाडा, (पाली-सुधागड) या विद्यामंदिरचे मुख्याध्यापक शरद निकुंभ यांच्या सेवानिवृत्तीचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सुएसोचे सचिव ग. रा. म्हात्रे यांनी भूषविले. या वेळी सुएच्या अध्यक्षा गीताताई पारलेचा, सुएसोचे सचिव ग. रा. म्हात्रे, ग. बा. वडेर हायस्कूल पालीचे मुख्याध्यापक भाऊसाहेब घोडके, माजी मुख्याध्यापक एस. एल. ठाकरे, निवृत्त शिक्षक जे. बी. पाटील, मुख्याध्यापक शरद निकुंभ, त्यांच्या पत्नी शिक्षिका संगिता निकुंभ, आई, मुलगी आर्या निकुंभ, मेहुणे सचिन बोरसे, बहीण शैला जगताप, हितचिंतक, मित्रपरिवार, शिक्षकवर्ग व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

दरम्यान यावेळी विविध मान्यवर, शिक्षक वर्ग मित्रपरिवार व हितचिंतक यांनी शरद निकुंभ यांचा यथोचित सत्कार करून त्यांना प्रेमभावनेने सेवानिवृत्तीचा निरोप दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जी. आर. नागठाणे यांनी तर आभार एच.आर. बिरादार यांनी मानले.



# चौक दूर क्षेत्र पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दिन



**चौक : प्रतिनिधी**

चौक दूर क्षेत्र पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने पोलीस उप निरीक्षक विशाल पवार यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. या वेळी चौक परिसरातील मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्र दिनाचा ६६ वा वर्धापन दिन आज चौक पोलीस दूर क्षेत्र येथे आयोजित करण्यात आला होता. पोलीस उप निरीक्षक विशाल पवार यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

या वेळी चौक व चौक परिसरातील ज्येष्ठ नागरिक,व्यापारी, पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष अनंत ठोंबरे पाटील, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष हर्षल हनुमंते, जेष्ठ पत्रकार अर्जुन कदम,विविध मंडळांचे पदाधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी चौक दूर क्षेत्र पोलीस ठाण्यातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



**नागोठणे : पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांना वाढदिवसानिमित्त भाजप रोहा तालुका सरचिटणीस आनंद लाड, शहर अध्यक्ष सचिन मोदी, तालुका क्रीडा संयोजक शेखर गोळे, आकाश मढवी, ज्येष्ठ कार्यकर्ते विवेक रावकर, सुरेश जैन, धनराज उमाळे आदींनी शुभेच्छा दिल्या.**

# कामगार दिनानिमित्त विद्यार्थ्यांकडून चावडी वाचन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन ग्रुप ग्रामपंचायत वासांबे यांच्यावतीने साजरा करण्यात आला. तत्पूर्वी महाराष्ट्र दिनाचे निमित्ताने महाराष्ट्र दिनाचा ६६ वा वर्धापन दिन साजरा करताना सरपंच उमा मुंढे यांनी ध्वजवंदन केले.

या वेळी मोहोपाडा जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी देशभक्ती गीत गावून चावडी वाचन केले.



यानंतर ग्रुप ग्राम पंचायतीच्या वतीने माझी वसुंधरा ६.० अंतर्गत उद्घाटन करून सुरुवात करण्यात आली. या वेळी विद्यार्थ्यांनी वासांबे मोहोपाडा ग्रुप ग्रामपंचायत ते शिवाजी चौक अशी जनजागृती रॅली काढली.

या वेळी सरपंच उमाताई मुंढे, ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील, `ग्रामपंचायत सदस्य यांच्यासह ज्येष्ठ नागरिक, व्यापारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमोल कदम यांचा सत्कार

**चौक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीतील कामगार अमोल शांताराम कदम यांचा गुणवंत कामगार म्हणून १ मे रोजी कामगार दिन व महाराष्ट्र दिन निमित्ताने सन्मान करण्यात आला.

अमोल शांताराम कदम हे सद्या खालापूर या तालुक्याच्या ठिकाणी वरिष्ठ यांत्रिकी म्हणून कार्यरत आहेत, खालापूर हे तालुक्याचे ठिकाण असून सर्व शासकीय प्रशासकीय कार्यालय व खागजी कार्यालय या ठिकाणी आहेत, हा ग्रामीण भाग असून गुंतागुंतीचा कार्यभाग असून तो यशस्वी पणे सांभाळत आहेत. त्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना भरीव योगदान आणि केलेल्या उल्लेखनीय कामगिरी बद्दल गुणवंत कामगार म्हणून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे मुख्य अभियंता महाराष्ट्र परिमंडळ चंद्रमणी मिश्रा यांचे हस्ते सन्मान चिन्ह आणि प्रशिस्त पत्र देण्यात आले.



अमोल कदम यांना मिळालेल्या पुरस्कारामुळे त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पंजाब ‘किंग्ज’; सीएसके ‘आऊट’



**चेन्नई : वृत्तसंस्था**

महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वाखालील चेन्नई सुपर किंग्जचा संघ यंदाच्या हंगामातून आउट होणारा पहिला संघ ठरला आहे. चेपॉकच्या घरच्या मैदानात पंजाब किंग्जनेही सीएसकेचा धुव्वा उडवला. आयपीएलच्या इतिहासात पहिल्यांदाच या संघावर सलग दोन हंगामात प्लेऑफआधीच गाशा गुंडाळण्याची वेळ आली आहे.

चेपॉकच्या मैदानात रंगलेल्या सामन्यात सॅम कुरेन याने केलेल्या ८८ धावांच्या खेळीमुळे चेन्नई संघाने या वेळी फलंदाजीत धमक दाखवली, पण १९व्या षटकात युजवेंद्र चहलने हॅट्ट्रिकसह चार बळी घेतल्यानंतर कुरेनच्या दमदार खेळीवर पाणी फेरले. ही लढाई चेन्नईचा संघ २०० पारची करेल असे वाटत असताना त्यांचा डाव १९० धावांतच आटोपला.

सीएसकेच्या संघाने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना सलामीवीर प्रभसिमरनच्या अर्धशतकी खेळीशिवाय श्रेयस अय्यरनेही दमदार अर्धशतक झळकावले.

पंजाबविरुद्धच्या सामन्यासह सीएसकेच्या संघाने यंदाच्या हंगामात चेपॉकच्या मैदानात सहावा सामना गमावला. एवढेच नाही तर आयपीएलच्या आतापर्यंतच्या इतिहासात पहिल्यांदाच चेन्नईच्या संघाने घरच्या मैदानात सलग पाच सामने गमावल्याचेही पहायला मिळाले.

### युजवेंद्र चहलची हॅट्ट्रिक

पंजाबचा गोलंदाज चहलने या लढतीतील १९व्या षटकात तळाचे तीन फलंदाज ओळीने गारद करीत शानदार हॅट्ट्रिक साजरी केली. त्याने चौथ्या चेंडूवर दीपक हुडा, पाचव्या चेंडूवर अंशुल कंबोज, तर शेवटच्या चेंडूवर नूर अहमदला बाद केले. याच षटकातील दुसऱ्या चेंडूवर त्याने धोनीला बाद केले होते. चहलची आयपीएलमधील ही त्याची दुसरी हॅट्ट्रिक ठरली, तर तो पंजाब किंग्जकडून हॅट्ट्रिक घेणारा चौथा गोलंदाज ठरला आहे. याआधी युवराज सिंगने पंजाबकडून दोनदा अशी कामगिरी केली होती.

# पनवेल मनपाच्या क्रिकेट अकादमीत निवड चाचणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या नवीन पनवेल आदई सर्कल येथील दिलीप वेंगसरकर क्रिकेट अकादमीत आंतरराष्ट्रीय क्रिकेट निवड चाचणीला युवा खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. १२, १४, १६ आणि १९ वर्षांखालील गटांसाठी आयोजित या निवड चाचणीच्या गुरुवारी पहिल्या दिवशी (दि. १) तब्बल ६६५ खेळाडूंनी आपले क्रिकेट कौशल्य दाखवले.

पहिल्या दिवशी १२ वर्षांखालील गटात २१०, १४ वर्षांखालील गटात १८५, १६ वर्षांखालील गटात १२५ खेळाडू आणि १९ वर्षांखालील गटात १४५ खेळाडूंनी सहभाग घेतला. निवड चाचणी ४ मेपर्यंत सकाळी ७.३० ते १० आणि सायंकाळी ४ ते ६.३० या वेळेत सुरू राहणार आहे. या निवड चाचणीची प्रक्रिया पूर्णपणे विनामूल्य असून युवा खेळाडूंना या संधीचा लाभ घेत आपले क्रिकेटमधील कसब सिद्ध करण्याची संधी आहे.

प्रशिक्षणासाठी खेळाडूंची अंतिम निवड मे महिन्यात केली जाणार आहे, तर प्रत्यक्ष प्रशिक्षण ऑक्टोबर २०२५ ते मे २०२६ या कालावधीत चालेल.

या निवड चाचणीच्या पहिल्या दिवशी भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार कर्नल दिलीप वेंगसरकर, मुख्य प्रशिक्षक अमित जाधव यांच्यासह भाजपचे पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंजारराव, नेरे मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, अक्षय सिंग, शुभम कांबळे, श्रावण घोसाळकर, प्रशांत करपे यांच्यासह प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.



# कामगार स्मृती चषक आदिवासी कबड्डी स्पर्धेस उत्साहात प्रारंभ

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय केमिकल अ‍ॅण्ड फर्टीलायझर्स (आरसीएफ) लि., थळतर्फे अलिबाग प्रेस असोसिएशनच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या कामगार स्मृती चषक जिल्हास्तरीय आदिवासी कबड्डी स्पर्धेला गुरुवारी (दि. १) प्रारंभ झाला.

आरसीएफ वसाहत, कुरूळ येथील क्रीडासंकुलात ही स्पर्धा खेळविण्यात येत आहे. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यात ६४ आदिवासी संघ सहभागी झाले आहेत.

आरसीएफ थाळचे कार्यकारी संचालक नितीन हिरडे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. महाव्यवस्थापक संजीव हरळीकर, महाव्यवस्थापक सुधीर कोळी, अभय कालबाडे, व्ही. मंगेश, उपमहाव्यवस्थापक विनायक पाटील, सर्व संघटनांचे प्रतिनिधी, मानव संसाधनचे अधिकारी, प्रशासनाचे अधिकारी, वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी डॉ. राकेश कवळे, माजी राष्ट्रीय खेळाडू दिलीप धुमाळ उपस्थित होते.

स्पर्धेत विजेत्या संघास रोख २५ हजार रुपये व चषक, उपविजेत्या संघास रोख १५ रुपये व चषक, तृतीय व चतुर्थ क्रमाक मिळवणाऱ्या संघास रोख १० हजार रुपये व चषक अशी सांघिक बक्षिसे देण्यात येणार आहेत. याशिवाय स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू, उत्कृष्ट पकड, उत्कृष्ट चढाईसाठी रोख रक्कम व चषक अशी वैयक्तिक बक्षिसे आहेत.

# पनवेल तालुका क्रीडा संकुलात खेळ कौशल्य प्रशिक्षण, व्यक्तिमत्व विकास शिबिराचे उद्घाटन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा धोरणांतर्गत पनवेल तालुका क्रीडा संकुलामध्ये उन्हाळी सुटीचा सदुपयोग साधत विद्यार्थ्यांसाठी विनामूल्य क्रीडा कौशल्य प्रशिक्षण व व्यक्तिमत्व विकास शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून आमदार प्रशांत ठाकूर आणि ऑलिम्पिक नेमबाज, अर्जुन व द्रोणाचार्य पुरस्कार तसेच महाराष्ट्र शासनाचा जिजामाता क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार विजेत्या सुमा शिरुर यांच्या हस्ते गुरुवारी (दि. १) झाले.



या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी संकुलातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडवण्याचा संकल्प व्यक्त केला तसेच संकुलातील सुविधांचे अद्ययावतीकरण करून जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. या वेळी त्यांनी आंतरराष्ट्रीय नेमबाज प्राजक्ता अंकोलेकर (साऊथ एशियन गेम्स २०२२ कांस्यपदक विजेती) आणि मानवी शर्मा (राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड) यांचा सत्कार केला.

उपविभागीय अधिकारी पवन चांडक यांनी खेळाडूंना तंदुरूस्त राहण्यासाठी खेळाकडे गांभीर्याने लक्ष देण्याचे आवाहन केले. खेळ आणि शिक्षण हे एका नाण्याच्या दोन बाजू आहेत, असेही ते म्हणाले.व

सुमा शिरुर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, एक चांगला खेळाडू घडण्यासाठी मैदानावर उतरणे आवश्यक आहे. मी स्वतः विविध खेळ खेळले. एनसीसीमध्ये असताना प्रथमच बंदूक हातात घेतली आणि त्यानंतर मागे वळून पाहिले नाही. मेहनत आणि जिद्दीने आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचता येते.

प्रारंभी जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांनी शिबिराविषयी माहिती दिली. १० ते १२ वेगवेगळ्या खेळांचे प्रशिक्षण देणारे हे पहिले शिबिर असून दीड महिन्याच्या कालावधीत १५०पेक्षा अधिक खेळाडूंनी नोंदणी केली आहे. तालुका क्रीडा संकुल समितीमार्फत या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून सहभागी खेळाडूंना विनामूल्य टी-शर्ट व शॉर्ट्स देण्यात आले.

सूत्रसंचालन अर्जुन यांनी केले. कार्यक्रमास अनेक मान्यवर, प्रशासनातील अधिकारी, खेळाडू आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.






# माणगावमध्ये क्रिकेट लीग

**माणगाव : प्रतिनिधी**

जुने माणगाव प्रीमिअर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन येत्या रविवारी (दि. ४) तीन बत्ती मैदानावर करण्यात आले आहे. या स्पर्धेचे यंदा चौथे वर्ष आहे.

स्पर्धेतील प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ क्रमांक विजेत्या संघांना आकर्षक चषक, उत्कृष्ट फलंदाज व गोलंदाजाला आकर्षक चषक, सामनावीरास मेडल, तर मालिकावीरला होम थेटर देऊन गौरविण्यात येईल.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com